म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा-वा-
दा क्र. ८८५

# राजा शिवाजी

BVBK-0400885
BVBK-0400885

कि.

बा. वी.

नों. क्र. ११५

बाल वाङ्मय विभाग

बा. क्र. ११५ दिनांक ......

विषय किशोर क्र. ३१२

मुलांच्या शब्दात

# राजा शिवाजी


[illegible] शाखा.

[illegible]

बा. क. 115 दिनांक .....

विषय किशोर [illegible] 362.

BVBK-0400885


☐ संयोजक :

श्री. ना. वा. जोशी,
एम्. ए., बी. टी.

☐ संपादिका :

सौ. कुमुद ओगले,
एम्. ए., बी. एड्. ( प्रथम वर्ग )

☐ 'शिव–चरित्र–दर्शन–प्रकल्प
आत्माराम विद्या मंदिर, ओगलेवाडी.

# राजा शिवाजी :

☐ प्रकाशिका : **सौ. प्रशांता भंडारी,**
वैभव प्रकाशन,
कोरेगाव ( सातारा )

☐ प्रथमावृत्ती : १९७६

☐ (C) : वैभव प्रकाशन, कोरेगाव.

☐ मूल्य : **चार रुपये. पंचाहत्तर पैसे**

☐ मुद्रक : **वि. रा. नावडीकर,**
श्री दत्त प्रेस, कराड.

# अभ्यास-प्रकल्पाची ओळख

माध्यमिक शिक्षणाच्या प्रमुख उद्देशापैकी एक प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांच्या चारित्र्य घडणीस सहाय्य करणे हा असतो. त्यासाठी अभ्यास विषय ( Curricular Subjects ) जसे उपयुक्त असतात तसेच अभ्यासपूरक विषयही उपयुक्त असतात. अशा अभ्यासपूरक विषयांना सहाय्य करू शकणाऱ्या अनेक उपक्रमांचाही रास्त उपयोग अशा कामी होतो.

देशाचा इतिहास घडविणाऱ्या महापुरुषांच्या चरित्राचा उपयोग या दृष्टीने प्रभावीपणे होऊ शकतो हे निर्विवाद आहे. याच कल्पनेने अशा महापुरुषांच्या चरित्राचा अभ्यास करवून घेण्याचा योजनापूर्वक उपक्रम आमच्या विद्यालयात ' महात्मा गांधी–जन्मशताब्दी 'च्या निमित्ताने पूर्वी करण्यात आला होता. त्या उपक्रमातून साकारलेले ' मुलांच्या शब्दात गांधीजी ' हे पुस्तक १९७० मध्ये पुण्याच्या व्हीनस बुकस्टॉलने प्रकाशित केले आहे. तशाच प्रकारची सुसंधी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यारोहणाच्या त्रिशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा साधण्याचा आमच्या विद्यालयाने प्रयत्न केला.

वेगवेगळ्या वर्गांतील निवडक विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या चरित्रातील ठळक घटना व विषय अभ्यासासाठी सुचविण्यात आले. त्या त्या विषयांना पूरक पुस्तके अभ्यासासाठी पुरविण्यात आली. वेगवेगळ्या शिक्षकांनी या अभ्यासूंना मार्गदर्शन केले. या सर्व अभ्यासूंनी लिहिलेल्या निवडक लेखांना आमच्या विद्यालयातील अध्यापिका सौ. कुमुद ओगले यांनी आपल्या शैलीदार भाषेत मार्मिक प्रस्तावना लिहिल्या. असा हा अभ्यास प्रकल्प आमच्या विद्यालयाच्या 'उपासना' वार्षिक नियतकालिकात प्रकाशित करण्यात आला. या अंकाचे प्रकाशन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवभक्त श्री. भालजी पेंढारकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी प्रकल्पाशी संबंधित अशा सर्वांना शतशः धन्यवाद दिले. त्यामुळे आम्हा सर्वांना विशेष समाधान वाटले असल्यास नवल नाही.

इतिहासाचा अभ्यास आजच्या काळात कितपत उपयोगी होणार अशी एक शंका असे कार्य हाती घेताना मनात डोकावली तर नवल नाही. त्याबरोबरच पूर्वजांचे केवळ पोवाडे गाऊन आज काय उपयोग असाही प्रश्न

कोणी विचारणे अशक्य नाही. पण ही शंका नि असा प्रश्न मनात निर्माण होऊनही शिवचरित्राचा अभ्यास नि:संशय उपयुक्त ठरणार आहे अशी खात्री वाटल्याने विचारपूर्वक हा प्रकल्प आम्ही पूर्ण केला आहे. शिवचरित्राच्या कथाभागाबरोबरच शिवाजी महाराजांची राजनीती, महाराजांचा लोकसंग्रह, महाराजांचे युगप्रवर्तकत्त्व अशा विषयांचाही अभ्यास विद्यार्थ्यांकडून त्यांच्या मर्यादामध्ये व्हावा असा प्रयत्न करण्यात आला आहे. म्हणजे या ' शिवचरित्र अभ्यास प्रकल्पा ' मध्ये जिज्ञासा व श्रद्धा या दोहोंचाही समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे.

योगायोगाने हा प्रकल्प कोरेगाव (सातारा) येथील वैभव प्रकाशनाच्या सौ. प्रशांता भंडारी यांनी पाहिला व शैक्षणिक दृष्टचा असणारे या प्रकल्पाचे महत्त्व जाणून तो पुस्तकरूपाने वैभव प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्याचे त्यांनी मान्य केले. ' शिवचरित्र–दर्शना ' चा प्रकल्प आता त्यांच्या सहाय्याने ' राजा शिवाजी ' पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित होत आहे.

विशेष भाग्य असे की ' राजा शिवाजी ' या आमच्या विद्यार्थ्यांच्या पुस्तकास सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गो. नी. दांडेकर यांची आशीर्वाद–रूप प्रस्तावना लाभू शकली. श्री. गो. नी. दांडेकर हे महाराष्ट्राचा इतिहास साक्षेपीपणाने व मार्मिकपणे जाणणारे साहित्यिक. शिवाजी राजाच्या पदरजांनी पुनीत झालेली सारी भूमी त्यांनी धुंडाळलेली. नव्या नव्या कामात कार्यमग्न पण ' मुलांच्या चाली चालावे ' हे समर्थांचे सूत्र मानणारे. म्हणूनच त्यांच्या सारख्याने या आमच्या प्रकल्पाकडे कौतुकाने पाहिले व प्रस्तावना लिहिली. त्यांचे आम्ही सदैव ऋणी आहोत.

या आमच्या अभ्यास प्रकल्पाची ओळख वाचकांनी सौ. कुमुद ओगले यांच्याच शब्दात वाचावी व प्रत्येक प्रकरणाचा धागा त्यांच्या शब्दातूनच पकडण्याचा प्रयत्न करावा. हे शिवचरित्र सिद्धीस जाण्यास सर्व विद्यार्थी–लेखक, शिक्षक, प्रकाशक, मुद्रक या सर्वांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. या काहीशा वेगळ्या स्वरुपाच्या प्रकल्पाचा स्वीकार वाचकांकडून आपुलकीने व्हावा व विद्यार्थ्यांच्या कृतीला प्रोत्साहन मिळावे हीच इच्छा !

ओगलेवाडी<br>
दि. १५ ऑगस्ट ७६

**ना. वा. जोशी**<br>
शाला–प्रमुख.

★

# शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी समारंभ

हो, ठरलं साजरा करायचा. त्या निमित्ताने शिवरायाचे आठवायच रूप. सोन्यासारखे गुण. कल्पनेच्या पंखांनी ३०० वर्षे मागे जायचे. मानसिक पूजेने आणि दर्शनाने ते देवदत्त चैतन्य रोमारोमात भरून घ्यायचे, फुलून जायचे. भारताच्या या मातीत त्याची सुवर्णपावले उमटली, गडावरचा भन्नाट वारा या राजीयाच्या श्वासाने उन्मत्त होऊन उठला. त्याच भूमीची आपण लेकरे, त्याच वैभव संपन्न राजाचे वारस. आमच्याही पेशीपेशीतून उठू देत लहरी ' हर हर महादेव '.

मग करायचा साजरा समारंभ.

कसा ?

फोटोची मिरवणूक काढून ? लेझीम खेळत ?

छे, ते तर प्रदर्शन, नको त्याचे दर्शन.

मग नागरीक, पालक, व्यापारी, विद्यार्थी यांचेकडून जमवावा पै पैसा.

भव्य उभारावा एक पुतळा शाळेच्या आवारात.

येता जाता नजर जावी, अभिमान दाटून यावा.

पण खरेच असे होते का ?

जेथे जथे पुतळे उभे आहेत ते अनाथ झाले आहेत.

पक्षांनी यावे, घाण करावी.

धुळीने मनसोक्त त्यावर बागडावे.

हे एक.

दुसरे असे, रोज रोज पाहून त्यातला हेतूच मरून जातो. चार दिवस वाटेल अभिमान. मग लक्ष तरी जाईल का ?

गेले तरी जाणिवा जागृत होतील का ?

मग काय उपयोग ?

असे करावे का...

प्रत्येक वर्गाने एकेका गडाची सहल. हं, सहल म्हणजे समजले ना ? त्या गडाची माहिती काढावी, इतिहास शोधावा. शिवरायाचा, मावळे-

गडयांचा महाप्रताप आठवावा, बाजीप्रभूच्या खिंडीत पावन व्हावे. तानाजीचा सिंहगड, रायरीचा तो पायथा पहावा, रायगडावरचे सिंहासन पहावे.

छान, कल्पना छानच... पण...

गडावर जायचे... कसे चालत ?

गड चढता चढता अर्धे मेले होणार, मग चालतो कसले ? त्या आमच्या वेडया राजाने रायगडावरून किती वेळा, किती तांतडीने, हरणाच्या गतीने, सिंहाच्या छातीने, चढउतार केली असेल. घोडयावरून !

आम्ही एकदा तरी जावे म्हणतो.

हा खर्च कोण करणार ? तेल मिठाला पैसा नाही, तेथे... हो, पोटाच्या खळगीत निदान दिवसातून एक वेळ तरी काही जायला पाहिजे तर इतरत्र लक्ष जाईल, विचार येतील, काही करायची उमेद आणि शक्ती येईल, पण...

म्हणजे गडाचे दर्शन नाहीच.

खूप खल... विचारांची देवघेव.

आणि ठरले म्हणजे अगदी पक्केच.

या विद्यार्थ्यांना हे सारे शिवचरित्र वाचायला प्रवृत्त करावयाचे. शिवा लहानपणी काय खेळायचा, कसा विचार करायचा, असे विचार का करायला लागला, सामाजिक, नैतिक, राजकीय, आर्थिक, मानसिक परिस्थितीने त्याला घडवले का ? त्याची स्फूर्तिस्थाने कोण, ते संस्कार कसे झाले ? एक एक स्वारी म्हणजे रोमहर्षक कशी ? दरवेळी राजकारणाचे नवे डाव !

माणसे... माणसे... त्यांचे गुण... पारख... त्यांच्यात या भूमीबद्दलची निष्ठा त्याने कशी रुजवली असेल ? ते भाबडे मावळे चैतन्य [illegible] कसे झाले ?

पोर्तुगीज, इंग्रज, यवन– प्रत्येकाची तऱ्हा निराळी, डाव निराळे... त्या बलाढ्य शक्तींना राजाने कसे नमवले... आणि हे सारे करता करता तो माणूस... एक भारतीय– म्हणून का आदर्श ठरला, भारतीय संस्कृतीने

त्याला घडवले मग त्याच्या प्रत्येक आचरणातून, पावलोपावली ते दर्शन कसे घडते ? तो दैवी शक्ती मानत होता की नाही ?... आणि कितीतरी असंख्य... अगणित गोष्टी !

मुलांनी रंगून जावे, समरस व्हावे, विचारांचे तुफान डोक्यात धुमाकूळ घालू लागावे, प्रकाशाच्या असंख्य चैतन्यपूर्ण ठिणग्या दिसाव्यात, त्या पकडायचा प्रयत्न त्यांनी करावा, शब्दांत मांडावा, दोस्त मंडळीसमोर ठेवावा, तेवढा काल तरी शिवप्रभूच्या विचारांत हरवून जावा, हरवून जाऊन सार्थकी लागावा.

साऱ्यांनी यात सामील व्हाव. एक शिक्षकाकडे एक वर्ग, एक विषय.

जवळ जवळ शंभर एक पुस्तके जमा केली. विषयानुरुप वाटणी झाली... मुलांनी वाचायला सुरवात केली.

कोणी म्हणाले ‘ हे उपयोगी नाही, मुले नुसते उतरवून काढतील. ’

बघू तर, शक्यतो पुन्हा लिहायला लावायचे स्वतःच्या भाषेत,– असेना कच्ची... मोडकी तोडकी, भाव महत्वाचे, त्या निमित्ताने मनःपूर्वक वाचन तरी झाले... तोच उद्देश आणि लिखाण तर पुस्तकावरच आधारित.

काम सुरू झाले. कल्पना नाही येवढा उत्फूर्त प्रतिसाद बालगोपालांकडून आला. भरपूर लेख.

निवड करावी लागली.

मजकुराची काटछाट.

कागद टंचाईची झळ...

शिवबाला सुद्धा लागली !

ज्याचे जीवन, ज्याचे गुण, ज्याची झेप, दुःख, यश, अपयश अनेक ग्रंथ लिहून सुद्धा पुरेसे झाले असे वाटणार नाही ते आम्ही थोड्या पानात, काही शब्दात पकडायचा क्षीण प्रयन्त केला आहे.

म्हणजे ही त्या अती तेजस्वी जीवनाची एक झलक– छोटीशी...

नव्हे नव्हे त्या महासागराचा एक बिंदु.

कोण कुंभार, कोण बडे,... भोसले, पिसाळ... कोण कोण अनेक खेड्यातून, झोपड्यातून राहणारी आठ आठ दहा दहा मैलावरून अनवाणी

पायांनी चालत शाळेला येणारी .. तसे वाचन जवळ जवळ नाहीच- एखाद्या विषयावर चिंतन करण्यांची सवय नांही. त्यामुळे जाण कमी. अभिव्यक्तीला शब्दभांडार नाही. शेतीच्या कामातून काही करायला सवड नाही, अभ्यासाला जागा नाही, घरात दिवा नाही... नाही नाही, हे नाही आणि ते नाही... ' नाहीच ' जास्त.

हीच सारी ग्रामीण शाळांची कथा अन् व्यथा.

... रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग- घ्यायच नाव, जीवन येथूनच फुलते- कर्तृत्व तावून सुलाखून सुवर्णमय होते.

नाही म्हणून काय गप्प बसायचे ?

का टीका करत ओरडत बाष्कळ बडबडत रहायचे ?

शून्यातून जर ब्रम्ह निर्माण होऊ शकते तर...

तर जे थोडे फार आहे त्यातून, मातीतून मूर्ती होतात, दगडातून सुंदर शिल्पे कोरली जातात, तसे काही निर्माण का करू नये ?

हवी फक्त उदंड इच्छा, अखंड धडपड आणि कौशल्य.

झाले- मुलांनी शिक्षकांनी हा संकल्प जिद्दीने पार पाडला.

अंक तयार झाला.

महाराज बाल- भावनेतून, निष्ठेतून, श्रद्धेतून, अभिमानातून शब्दा-शब्दात प्रकट झाले.

प्रकाशन कोणाच्या हस्ते करावे ?

एकच नाव समोर आले.

भालजी पेंढारकर, दुसरे नाही... तेच... येथे पर्याय चालणार नाही चालवून घेणारही नाही.

अशी उत्कट इच्छा तो दयामय पूर्ण करतोच.

भालजी आले. भारावून गेले. भरभरून- आशीर्वादाचा कौतुकाचा वर्षाव झाला. तेथे कृत्रिमता नाही, औपचारिकपणा नाही. विषय जीवन श्रद्धेचा.

धन्य धन्य झालो. कौतुकाने फुलून गेलो.

मग चटक, लागते ना .. कौतुक करून घेण्याची, अनेक नामवंतांना अंक पाठवले. अनेकांना पाठवावयाचे राहून गेले.

कौतुकाचे शब्द पोच झाले.

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. आ. बुवा मुंबई, आदर्श शिक्षक श्री. द्वा. वा. केळकर पुणे, प्राचार्य श्री. क. श्री. काळे सांगली, मुख्याध्यापक श्री. ह. रा. केंजळे वडूज, अशा नामवंत व्यक्तींनी कौतुकच कौतुक केले. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाच्या मुखपत्राने मोठा समर्पक अभिप्राय दिला.

अस करता करता सहज अंक सौ. भंडारी, कोरेगांव यांच्या हाती पडला.

धंदा प्रकाशकाचा, पण मन रसिकाचे. हृदय उदात्त, कौतुकाची वेगळीच तऱ्हा.

पुस्तकरूपाने हा अंक प्रकाशित झालाच पाहिजे. अनपेक्षित, ध्यानी मनी नसतांना हे घडून गेले.

मग काय ?

पुन्हा गडबड पुन्हा तपासणी.

अधिक सावध... जागृत.

केवळ त्यांच्यामुळे खेडेगावच्या अंगणात आपला संसार थाटून उभ्या राहिलेल्या आत्माराम विद्या-मंदिरातील लेखकांचे कष्ट फळाला आले. भाग्य उदयाला आले.

शब्दांनाही प्रसिद्धीसाठी योग यावे लागतात. जन्मपत्रिकेत ग्रह अनुकूल असावे लागतात.

दुसरे काय ?

हा साजरा झालेला उपासनेचा शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी विशेषांक पुस्तकरूपाने आम्ही जाणकारांसमोर ठेवत आहोत उणीवा सकट.

ही त्या शिवाच्या भवानीचीच कृपा !

असं आहे, भूमीच्या आधाराखेरीज बीज अंकुरत नाही. त्यातूनच त्याच भूमीत ठराविक बीजेच अंकुरायची... परकी नाही. वातावरण, हवामान, पाण्याचा, मातीचा गुण त्याच बीजांना पोषक... मग खतपाणी, प्रकाश... वाढतील. पण आधार भूमीचा हे पक्के. म्हणू देत कोणाला काय म्हणायचे ते.

तर अशी ही कथा.

म्हणून ११ वी चा हा विद्यार्थी **अशरफ खतीब** सादर करीत आहे–

## सूर्योदयाआधी–

# सूर्योदयाआधी

... दंडकारण्याचे नाव ऐकताच अंगाचा थरकाप होत असे. हे अरण्य होतेच तसे घनदाट, काटेरी व विषारी. वृक्ष—वल्लीनी दाटलेले. स्वप्नातही न पाहिलेली श्वापदे येथे प्रत्यक्ष दिसत. जो कोणी तेथे जाई तो न परतण्यासाठीच. पण एक दिवस आगळे आश्चर्य घडले. त्या सहा पावलांनी जेवढे अरण्य स्पर्शिले गेले तेवढे पवित्र होत गेले. ही पावले होती प्रभु रामचंद्र, लक्ष्मण व सीता यांची. तत्पूर्वीही या अरण्यांत ऋषींनी निवास केला होता. गोदावरीच्या उदकाने आचमन केले होते. पण राम-लक्ष्मण-सीता यांच्या १४ वर्षांच्या निवासानंतर हळूहळू या अरण्याचे स्वरुपच पालटू लागले. तिथे छोटया छोटया वस्त्या झाल्या. त्यांची पुढे ग्रामे व नंतर लहान मोठी शहरे. पैठण शहर खूपच भरभराटीस आले. सातवाहन नावाच्या राजाचे राज्य सुरू झाले.

सातवाहनाच्याच काळात 'महाराष्ट्र' झाले. राष्ट्राची अस्मिता जागृत झाली. दिग्विजयांचे युग आले. शूर, वीर, कवी, पंडित, कृषीवल आणि कलाकार या सर्वांनी महाराष्ट्राला बलवान बनविले, समृद्ध बनविले. पैठणच्या सातवाहनापासून देवगिरीच्या महादेवराव यादवापर्यंत हे वैभव वाढतच गेले. राजे प्रजापालनात दक्ष. प्रजाही सदाचारी आणि सुखी. महाराष्ट्रावर भाग्यलक्ष्मीच प्रसन्न होती. कोणत्याही परकीयाची डोळा वाकडा करून पाहण्याची छाती नव्हती. शांतता आणि स्थैर्य यामुळे कला बहरल्या. कलाकारांनी दगडांना हसविले आणि रडविलेही. सुंदर शिल्पे उभी राहिली. रम्य तळी तयार झाली आणि त्यांत कमळे फुलली. जागोजागी बागा बहरल्या. सरस्वतीच्या मळ्याला तर अमाप बहर आला. महानुभावांनी आपल्या मधुर कृष्णभक्तीच्या कविता गाइल्या. आणि या सर्वांवर कळस म्हणजे ज्ञानेश्वरांनी गीतामाउलीचे दूध मराठमोळ्या माणसापर्यंत पोचविले. ब्रम्हविद्येचा सुकाळ केला.

पण या साऱ्या वैभवाला आता दृष्ट लागणार होती. चंद्राला ग्रहणाचे वेध लागले. दिल्लीचा शासक अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर स्वारी

केली. रामदेवरायाची तयारी नव्हती. तरी त्याने आक्रमणाचा प्रतिकार केला. पण त्याला पराभव स्वीकारावाच लागला. फक्त पंधरा दिवसात देवगिरीची शान नाहीशी झाली. नामुष्की पदरी आली. पण एवढ्याने भागणार नव्हते. सन १२९६ मध्ये संत ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली. यादवांच्या भाग्यलक्ष्मी- बरोबरच महाराष्ट्राची सरस्वतीही आटून गेली.

यानंतर शतके उलटली. बहामनी साम्राज्य महाराष्ट्रामध्ये पसरले. त्याचेही पुढे तुकडे झाले. इकडे दक्षिणेला विजयनगरचे साम्राज्य उदयाला आले होते. त्याचीही नंतर धूळधाण झाली. बहामनी साम्राज्याचे पाचही सुलतान हिंदू देवळांची राखरांगोळी करीतच होते. भरीस भर म्हणजे १५१० मध्ये गोमंतकात अल्फान्सो अल्बुकर्क या पोर्तुगीजाने पाय ठेवला. त्यानेही हिंदूंची देवळे पाडण्यास सुरुवात केली. गोवा पोर्तुगीजांचे टाचेखाली गेला. पुढे मोठमोठे दुष्काळ आले, साथी आल्या, महाराष्ट्राची सारी प्रजा कासावीस झाली, भवानी मातेला आळवू लागली, हाका मारू लागली, 'बया दार उघड' आणि मग दार किंचित किलकिले झाले. प्रकाशाची धार बाहेर आली.

वेरूळच्या एका शेतांत घृष्णेश्वराचे एक जुने मंदिर होते. बाबाजी भोसल्यांची दोन मुले त्या देवळात दर्शनाला जात. त्यांची नावे होती मालोजी आणि विठोजी. या दोघांना वाटे की मंदिराचा जीर्णोद्धार करावा. पण त्यांच्या जवळ पुरेसे धन नव्हते. एके दिवशी त्यांना शेतात द्रव्याचा हंडा आढळला. त्यांना अपार आनंद झाला. त्यानी मंदिर नवीन बांधले. जवळ तळे खोदले. पुढे मालोजीची हुषारी लक्षात घेऊन बादशहाने त्याला पुणे व सुपे या गांवाची जहागीर दिली. मालोजीला उमाबाई यांच्या पोटी शहाजी हा पुत्र मोठ्या नवसा सायासाने झाला. पुढे दुसरा पुत्र शरीफजी झाला. पण पुढे एका लढाईत मालोजी कामास आले. पण जहागीर मात्र तशीच पुढे चालत राहिली. शहाजीचे लग्न लखूजी जाधव या मातबर सरदाराच्या मुलीशी- जिजाऊशी झाले. शहाजी आणि जिजाऊ यांच्याच उदरी एका नररत्नाचा जन्म झाला. त्याचे नांव 'शिवराय.'

★

# बालवयातील संस्कार

पवित्र अशा भरतभूमीत एक बीज अंकुरले. ह्या अंकुराला नेहमीच फार जपावे लागते. कडक उन्हाची तिरीप लागू नये म्हणून त्यावर टोपली तर झाकली पाहिजे. पण टोपली जास्त काळ राहिली तर ते रोपटे वेडेवाकडे वाढते. ते निरोगी वाढावे म्हणून काटछाटही करावी लागते. कंदीलाच्या काचे-सारखे, ज्योत भडकू तर नये पण त्याचवेळी प्रकाशही अडवला जाऊ नये.

कधी असेही होते, संस्कार करणारे चांगले असतात, तर मुलं न मानणारी. मुलं चांगली तर संस्कार करणारेच कोणी नाही. दाणा आहे तर चोच नाही, चोच आहे तर दाणा नाही.

असेही होते; माणूस योग्य असतो, तर वेळ बरोबर नसते. वेळ योग्य असेल तर माणूस चुकत रहातो... शिवबा याबाबत भाग्यवान कसा तो ८ वी मधील **सूर्यकांत कांबळे** याच्या शब्दात पहा.

... **बालपणी** झालेले संस्कार आयुष्यभर कसे उपयोगी पडतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. यवनांच्या गुलाम-गिरीतील महाराष्ट्राच्या सुदैवाने, शिवाजी महाराजांना अशा दोन व्यक्ती लाभल्या की त्यांनी महाराजांचे बालपण अनेक उत्तमोत्तम संस्कारांनी समृद्ध केले.

या दोन व्यक्ती म्हणजे महाराजांची पुण्यशील माता जिजाबाई व दादोजी कोंडदेव या होत. या दोन्ही व्यक्तींचे महाराजांच्या जीवनातील स्थान अनन्यसाधारण आहे. शिवाजी महाराजांचे बहुतांशी चरित्रकार या दोघांनाही बाल शिवाजीचे गुरू म्हणून संबोधतात.

शहाजीराजे विजापुरी बादशहाच्या चाकरीत असल्यामुळे त्यांना आपल्या कौटुंबिक जीवनाकडे लक्ष देता येत नसे. त्यामुळे जिजाबाईलाच शिवाजीचे वडील व आई होणे भाग पडले. शिवाजीला घेऊन पुणेप्रांती रहावयास आल्यावर तर ही जबाबदारी अधिकच वाढली. जिजाबाईनेही ती मोठ्या कुशलतेने पेलली.



आपला मुलगा शूर व्हावा, ज्ञानसंपन्न व्हावा यासाठी ही माऊली अविरत कष्ट घेत राहिली. तिने शिवाजीला रामायणातल्या अनेक कथा सांगितल्या. राम हा नुसता राजा नव्हता, केवळ एक शूर योद्धा नव्हता, तर अत्यंत विनयशील, वचनासाठी वनवास भोगणारा व पावित्र्यासाठी स्वतःच्या निष्कलंक पत्नीचा त्याग करणारा सत्वशील पुरुष होता. हे तिने आपल्या मुलाला या कथा सांगता–सांगता समजावले असावे. महाभारतातील अनेक रोमहर्षक प्रसंग तिने शिवाजीला सांगितले. कृष्णाच्या गंमती सांगितल्या. तसाच त्यांचा पराक्रम व दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी त्याने योजलेल्या युक्त्याही सांगितल्या. 'ठकासी महाठक व्हावे' हे शिवाजी यातून शिकला असावा. चोराशी खोटे बोलण्यात, दुर्जनांना दिलेले वचन मोडण्यात, लबाडांना

फसविण्यात कोणतेच पाप नाही, उलट हा धर्मच आहे. असा ठसा या कथानीच शिवाजीवर उमटवला. जरासंधाची भकले करणाऱ्या, दुष्ट दुर्योधनाची मांडी फोडणाऱ्या बलदंड भीमाची कथा जिजाईनेच आपल्या मुलाला सांगितली. शत्रूच्या कंठाचे अचूक वेध घेणारा अर्जुन, कवचकुंडलांचे दान करून धारातीर्थी पडणारा महावीर कृष्ण, वचनासाठी राज्यत्याग करणारा हरिश्चंद्र, आजन्म ब्रह्मचारी राहण्याची घोर प्रतिज्ञा करणारा भीष्म वनात एकटे राहून धनुर्विद्या शिकणारा व गुरुदक्षिणा म्हणून स्वतःच, उजवा आंगठा कापून देणारा दुर्दैवी एकलव्य, या साऱ्या पुण्यात्म्यांची चित्रे जिजाबाईनेच आपल्या लाडक्या लेकापुढे उभी केली.

या साऱ्या कथातून, जिजामाऊलीच्या शिकवण्यातून, महाराजांचे मन घडत होते. आकार घेत होते. ते स्वतःलाच अनेक प्रश्न विचारत होते. यातूनच एका महापुरुषाची जडण घडण होत होती. भीमार्जुनासारखे पराक्रम करावे, कृष्णासारखा दुष्टांचा युक्तीने काटा काढावा, रामासारखे पवित्र आचरण करावे असे या संस्कारामुळेच बाल शिवाजीला वाटू लागले.

या साऱ्या पार्श्वभूमीवर यवनांनी चालविलेले अत्याचार व दिवसा ढवळ्या लुटली जाणारी बायाबापड्यांची अब्रू पाहून शिवाजीला अतोनात वेदना होऊ लागत. अन्नासाठी व सत्तेसाठी आदिलशाहीची थुंकी झेलणारे नादान पुरुष, तुकड्या एवढ्या जहागिरीसाठी एकमेकांचे मुडदे पाडणारे सरदार, फितुरीने इनाम गिळू पहाणारे कपटी यांच्याविषयी प्रचंड संताप शिवाजी महाराजांच्या छातीत उसळू लागे. हा प्रदेश, ही माणसे, हे आकाश आपले आहे, आपण येथे स्वराज्य स्थापले पाहिजे, मग त्यासाठी प्राण गेला तरी बेहत्तर अशी विलक्षण महत्त्वाकांक्षा त्या छोट्या मनात आकारू लागली.

जिजाबाईच्या या साऱ्या प्रयत्नांना आपलेपणाने साथ दिली दादोजी कोंडदेव यांनी. पुणे सुभ्याची व्यवस्था ठेवण्याकरिता व आपल्या पत्नीपुत्रांना साह्य करण्यासाठी शहाजीराजांनी त्यांना नेमले होते. शहाजीराजांच्या विश्वासास ते पूर्णपणे पात्र ठरले. पोटच्या पोराइतकी त्यांनी शिवाजीवर माया केली. पगारी माणूस म्हणून ते कधीच वागले नाहीत. शिवाजीला

त्यांनी युद्ध शास्त्रातले, राज्य शास्त्रातले अनेक धडे दिले. माणसे कशी पारखावीत, त्यांची योग्य निवड कशी करावी, याचे ज्ञान दिले. अशी जिवाला जीव देणारी माणसे निवडल्यामुळेच भावी आयुष्यात शिवाजी महाराज अनेक प्राणघातक संकटातून निभावले. संघटना करण्याची व ती टिकविण्याची कौशल्ये शिवाजीला दादोजीपासूनच उमजली असावीत. शिवाजीला घेऊन दादोजींनी सारा सह्याद्रि पालथा घातला. आपल्या उदरात अनेक दऱ्याखोऱ्यांना घेऊन बसलेल्या महाराष्ट्राच्या दुर्गम प्रदेशाची ओळख करून दिली. शक्य तितके संस्कार करून, कष्ट घेऊन त्यांनी शिवाजीचे मन समृद्ध बनविले. त्याचे शरीर काटक व चपळ बनविले, बुद्धी तरतरीत बनवली. चपळ शरिरानेच महाराजांना अफझुलखानापासून वाचता आले, तर तैल-बुद्धीमुळे औरंगजेबासारख्या महाधूर्तांच्या हातावर तुरी ठेवता आल्या.

खरोखरच जिजाईसारखी माता व दादोजी कोंडदेवासारखा, सेवकाची व गुरूची दुहेरी भूमिका जाणतेपणाने पार पाडणारा धोरणी पुरुष, हे दोघे महाराजांना त्यांच्या बालपणात न लाभते तर महाराजांच्या आयुष्याने कसा आकार घेतला असता हे ठरविणे अवघड आहे. आकाशात चंद्रसूर्य शोभावेत त्याप्रमाणे महाराजांच्या चरित्ररुपी आकाशात हे दोघेजण शोभताहेत असे वाटते. त्यांना त्रिवार वंदन !

★

# अफझलखानाचा वध

वेळ आणि माणूस यांची सांगड उत्तम जमली. ज्या संस्कारांतून हा शिवबा घडवला गेला, त्या संस्कारांचे उत्तम दर्शन शिवबाच्या चालण्यात, बोलण्यात हरघडी दिसू लागले.

केव्हा भित्रेपणाचे सोंग वठवावे, हृदय सिंहाचे असून सशासारखा कावरेबावरे झाल्याचा अभिनय करावा, मंदिरे फोडली गेली तरी खर ही घटना म्हणजे कोणी हृदयाचा लचका तोडून रक्तबंबाळ केल्यासारखी, तरी... तरी ज्वालामुखी पेटला असता, सागराची शांती धारण करून... सावज सापळ्यात सापडायची वाट पहात राहयची... धीर सोडायचा नाही...

बघायच आहे अशावेळी कस वागायच ते ? मग वाचून पहाच आमचा ५ वी मधील छोटा **महेश थिटे** याने लिहिलेले हे वर्णन.

शिवरायांच्या जीवनामध्ये अनेक प्रसंग आले. त्यामधील अफझलखानाची भेट ही एक अविस्मरणीय घटना ठरली. तो प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखाच घडला.

कोकणात शिवाजीराजानी मांडलेल्या बातम्या विजापूर दरबारात येत होत्या. एक एक ठाणे, किल्ला, बंदर, मुलूख घाट हे बंडखोर मराठे बळकावीत होते. हे पाहून विजापूरचा अदिलशाहा, त्याची आई बडी बेगम साहेबा, सारे सरदार व इतर लोक थक्क होत होते. गेली साडेतीनशे वर्षे सुलतानांच्या सत्तेखाली बिनतक्रार राहणारे मराठे आज आपल्यावर उलटे फिरले. एवढा कोण पराक्रमी शिवाजी आला आहे ? बादशाहाने दरबारात विडा लावला. बडी बेगम साहेबा चवताळून म्हणाली, ' सिवा को गिरफ्तार

करनेके लिए कौन जान की बाजी लगायेगा ? बताओ ' दरबारांत प्रचंड शांतता पसरली. इतक्यात एक प्रचंड देह रप्, रप् पावले टाकीत पुढे आला आणि अस्मान गडगडावे तसा तो गरजला " मैं सिवा को गिरफ्तार करके हुजूरके सामने पेश करूँगा. " अचाट ताकदीच्या, अचाट शौर्याच्या पोलादी पुरुषाचे नांव अफझलखान. विजापुराहून आला. त्याने वाटेतील प्रेक्षणीय मंदिरे उध्वस्त केली. खान वाईत आला. त्याने आपला वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी याच्याकडून शिवरायांना दमदाटीचे पत्र पाठवले. त्यावर महाराजानी उत्तर पाठवले, " मी फार घाबरलो आहे. मला तिकडे येण्याची भीती वाटते. मला क्षमा करा. मी फार अपराध केला आहे. तुम्ही मला भेटायला या. " भेटीच्या अटी ठरल्या व सर्व मान्य झाल्या. खानाने होकार दिला.

महाराजांनी इकडे नेटाने तटवंदी सुरू केली. (१० नोव्हेंबर १६५९) चंपाषष्टीचा तो दिवस. खान आपल्या छावणीत भावी यशाची स्वप्ने पहात होता. महाराजांनी भेटीसाठी शामियाना उभारला. सोन्याच्या, चांदीच्या ताटामध्ये चांदीच्या पेल्यात उत्तम पेये ठेवली होती. गाद्या, लोड सर्व ठेवण्यात आले होते. त्यावर रेशमाच्या चादरी होत्या. चांदीची मोठमोठी चकचकीत तबके, त्यात चांदीच्या भांड्यात ठेवलेले पानविड्याचे साहित्य. त्यात उंची अत्तरांचा आणि गुलाबपाण्याचा घमघमाट. हे सर्व दृश्य नयनांना मोहित करणारे होते.

महाराजांनी शिवशंकराची मनोभावे पूजा केली. ब्राम्हणांनी तीर्थ दिले. महाराजांनी ते घेतले. ते तयारीला लागले. अंगात चिलखत घातले. त्यावर अत्यत सुबक विणीचा अंगरखा घातला. डोक्यावर जिरेटोप घातला. त्यावर मंदील बांधला. बोटांत वाघनखे घातली. महाराज निघाले.

खान महाराजांच्या आधी शामियान्यात येऊन बसला होता. महाराजांनी सर्वांना कामगिऱ्या समजावून सांगितल्या. तटावर तोफा दारुने ठासून तयार ठेवण्यात आल्या. महाराज शामियान्याजवळ आले. खानाचा रक्षक सय्यद बंडा हा होता. तो त्यांच्याजवळ होता. महाराज दारापाशी थांबले. खानाने महाराजांच्या वकिलास विचारले, ' महाराज आंत का येत नाहीत ? ' ' ते

सय्यद बंडास भितात, त्याला दूर करा.' बंडा दूर झाला. या बोलण्याने खान अधिकच बेसावध झाला.

महाराज आत आले. खानाने आलिंगन देण्याकरता आपले हात पसरले. त्याने महाराजांचे मस्तक आपल्या बगलेत दाबले. कुशीत कट्यारीचा



वार केला. महाराजांनी अत्यंत चपळाईने बिचवा पोटात खुपसला. 'दगा ऽ, दगा ऽ !' खान ओरडला. खान झुकांड्या खात बाहेर आला. इतक्यात पंताजी शिंगाड्याला म्हणाले, 'अरे शिंग फुंक'. शिंगाचा आवाज घुमला. तटावरील तोफेने सरबत्ती सुरू केली. इकडे सय्यद बंडा महाराजांच्यावर धावून आला. त्याचा वार महाराजांच्या डोक्यावर बसला, परंतु जिरेटोप असल्या कारणाने फारशी इजा झाली नाही. दुसरा घाव लागणार तोच जिवा महाल धावून आला व त्याने सय्यदला ठार केले. 'होता जिवा म्हणून

वाचला शिवा ' संभाजी कावजी धावला व त्याने भोयांना घायाळ करून खानाचे मुंडके किल्ल्याच्या शिखरावर नेले. थोड्या वेळात खानाच्या फौजेची मावळ्यांनी धुळधाण उडवली. महाराजांनी ७८ हत्ती, ३ लाखाचे जडजवाहिर, ७ लाखाचा नक्त खजिना मिळवला. प्रतापगड चिरंजीव झाला होता. तो दिवस सोनीयाचा उगवला.

' असा होता महाराष्ट्राचा सिंह, असा होता शिवप्रताप. '

★

# पन्हाळगडावरून सुटका

इयत्ता ६ वी तील **विश्वनाथ करंदीकर** आपल्या लेखाची प्रस्तावना करतांना म्हणत आहे–

"मी सुद्धा बाबासाहेब पुरंदऱ्यांनी लिहिलेलं 'राजा छत्रपती' पुस्तक (पुस्तक कसले, ग्रंथ. झोपतांना वाचत पडाव तर वजन कसल पेलतय ?) वाचलय. अफझलखानाच्या वधाच्या वेळेला घाबरल्याच नाटक केल ना ! मग सिद्दी जोहारने वेढा दिला पन्हाळ्याला, कशाने म्हणून डाळ शिजेना त्याच्यापुढे. केवढा उंच तो पन्हाळा, चौकी पहारे ! मग महाराजांनी काय युक्ती केली, तोड नाही, धाडसाला सीमा नाही.

नाही तर शक्ती आहे तर युक्ती नाही, युक्ती आहे तर शक्ती नाही. वा रे वा, बंदुक आहे तर गोळी नाही आणि गोळी आहे तर बंदुकच नाही.

महाराजांना परमेश्वराने दोन्ही हात भरभरून गुणांचे दान केले, पण महाराजांचीही झोळी काही फाटकी नव्हती. त्या दानाला महाराजांनी आणखी उजाळा दिला, शोभा आणली."

... 'शिवाजी महाराज' हे नांव घेतले की आपल्या डोळ्यासमोर धाडस, शौर्य, मुत्सद्दी वृत्ती व प्रसंगी दयाळू अथवा कठोर स्वभाव या गुणांनी सजलेली मूर्ती उभी राहते. अशा या शिवाजी महाराजांच्या पदरी अनेक मातब्बर सरदार होते. अशापैकीच एका सरदाराची कहाणी मी तुम्हाला थोडक्यात सादर करणार आहे.

महाराजांनी अदीलशाहाचा बलाढ्य सरदार अफझलखान याला मारल्यामुळे अदिलशाह हतबुद्ध झाला. त्याने खूप विचार करून आणखी

एक कर्तबगार, शूर, मुत्सद्दी सरदार शोधून काढला. त्याचे नांव ' सिद्दी जौहर. ' बादशहाने त्याला ' सलाबतखान ' हा किताब दिला. आपल्याबरोबर बारेमाप फौज, अमाप संपत्ती व हत्ती घोडे घेऊन जौहरने विजापुर'हून कूच केले.

महाराज व नेताजी अदीलशाही मुलखात धुमाकूळ घालत होते. महाराज मिरजेच्या किल्ल्याला वेढा घालून बसले होते. नेताजीने गोकाकपर्यंत मजल मारली होती. महाराजांना हेरानी बातमी दिली. महाराजांनी लगेच सरहद्दीजवळच्या किल्ला पन्हाळगडाकडे धाव घेतली.

जौहर पन्हाळगडाकडे निघाला. त्याची चाळीस हजार फौज पन्हाळ्याला, गुळाला मुंगळे चिकटावेत तशी चिकटली. मोर्चे बांधले गेले. तंबू, राहुट्या फडफडू लागल्या. मोक्याच्या ठिकाणासमोर तोफा उभ्या राहू लागल्या. राजापूरकर इंग्रजांना आमंत्रण मिळाले. इंग्रज कप्तान लांब पल्ल्याच्या तोफा, दारुगोळा व फॉल्इन् बंदुका पेलणारे वीर असे सर्वजण ड्रमच्या तालात जौहरच्या छावणीत आले.

पन्हाळगडावर महाराज चिंताक्रांत झाले होते. कारण इकडे जौहर तर तिकडे शाहिस्तेखान. दोघेही स्वराज्य बुडवायला निघाले होते. गडावरच्या लोकांना झोप, तहान, भूक सारे काही विसरून रात्रंदिवस लढावे लागत होते. मावळे व जौहरचे सैन्य एकमेकांवर सारखे दारुगोळ्याची आग ओकत होते. एका रात्री महाराजांना नकळत झोप लागली व एक स्वप्न पडले. महाराज सकाळी खडबडून उठले. स्नानविधी आटोपून महाराज सदरेवर आले. बाजीप्रभू, किल्लेदार त्र्यंबकपंत, वाघोजी, निराजी अशा खास मंडळीबरोबर महाराजांनी गुप्त बोलणी सुरू केली. दोन तीन घटकानंतर महाराजांचा वकील गगाधरपंत गड उतरू लागले. पुढे दोन मावळे पांढरी सफेद चादर घेऊन चालत होते. ते सिद्दी जौहरच्या छावणीशी येऊन पोचले. शिवाजी महाराज शरण आले आहेत. ते उद्या रात्रौ तुमच्याकडे येतील असे सांगितले.

शिवाजी शरण आला ही बातमी कळताच वेढ्यातील सर्वजण नाच, तमाशे, दारु व मास यांत रंगून गेले. सर्वजण गाफील होते. टोपीकर

इंग्रजांच्या टोप्या आनंदाने डोक्यावरच टणटण उड्या मारीत होत्या— जौहरचे सैनिक हातात तलवारीऐवजी दारूने भरलेले पेले घेऊन उभे होते.

रात्र झाली. पाऊस कोसळत होता, विजा कडाडत होत्या. गडावर दोन पालख्या तयार झाल्या. एकीत खरे शिवाजी महाराज व दुसरीत खोटे शिवाजी महाराज. हे तोतया शिवाजी महाराज म्हणजे महाराजांचा खास न्हावी. बरोबर निवडक पाचशे मावळे घेऊन हे दोघे शिवाजी बाजीप्रभूसमवेत निघाले. दोन पालख्या वेगवेगळ्या मार्गांनी जाऊ लागल्या. वेढ्यातून बाहेर पडल्यावर सर्वांना हायसे वाटले. पण वीज चमकली आणि आवाज आला. 'ठहरो, ठहरो, कौन है ?' जंगलातसुद्धा गस्तवाले होते. त्यांनी सर्वांना पाहिले होते. खऱ्या महाराजांची पालखी वेगाने पळविण्यात येत होती. गस्तवाल्यांनी सांगितलेल्या बातमीने छावणीत हाहाःकार उडाला. मसऊद पायदळ व घोडदळ घेऊन निघाला. त्यांनी तोतया शिवाजीला पकडले, छावणीत नेले, तेव्हा ज्या सरदारांनी शिवाजी महाराजांना पाहिले होते त्यांनी हा 'तोतया शिवाजी' असल्याचे सांगितले, तेव्हा मसऊद परत गेला व त्याने घोडखिंडीजवळ बाजीप्रभू व महाराजांना गाठले. बाजीने महाराजां-बरोबर काही मावळे देऊन त्यांना विशाळगडाकडे पाठविले व स्वतः काही मावळे घेऊन खिंडीत उभा राहिला. महाराज जाताना म्हणाले 'मी गडावर पोचल्यावर तोफांचे पाच बार करीन, मग तुम्ही निघून या.'

एवढे होईपर्यंत शत्रू खिंडीत आला. 'हर हर महादेव' बाजी ओरडला. मावळे व तो शत्रूला भराभर कापून काढत होते. सर्वजण प्राणपणाने लढत होते. बाजी पडला, पण इतर मावळे गनिमाला कापत होते. एवढ्यात तोफांचे पाच बार झाले व बाजीने प्राण सोडले. धन्य ते शिवाजी महाराज! धन्य तो बाजीप्रभू!! धन्य ते स्वराज्य!!!

*

# शाहिस्तेखानाची स्वारी

उथळ पाण्याला खळखळाट फार. शाहिस्तेखान ! नुसता कडकड करत आला. शिवधनुष्य उचलायला येणारे इतर राजे आपल्या शक्तीचे प्रदर्शन करत आले... झाले काय– फजिती. फजितीला पारावार नाही. गर्जेल तो पडेल काय ?

छे, रामाने नम्रपणाने पुढे जावून, गुरूला वंदन करून ते धनुष्य उचलले.

असेच असावे. शिवबाने असे प्रदर्शन, गाजावजा केला नाही. जे काहीच करत नाहीत, ते नुसती बडबड करत रहातात. आणि जे कर्तृत्ववान असतात ते मूक असतात.

... योजना, आंखणी, कामाची वाटणी, माणसांची निवड आणि हेरगिरी...

त्यांची मोहीम यशस्वी का होत होती समजले ना ? कशात नाव ठेवायला जागा नाही, सुईच्या अग्राएवढी चूक नाही. मग परिणाम.

हो आणि राहिलेच, नुसती आपली योजना ठीक असून भागत नाही, शत्रूच्या उणीवा लक्षांत घेऊन पावले टाकावी लागलात.

... मग असे सगळे जमले तर... शत्रूची कशी फजिती होते... ते ७ वी मधील **कु. शालन महामुनी** सांगत आहे.

... आजचे जग शिवाजी महाराजांना ' युगपुरुष ' म्हणून मान देते, हे काही त्यांच्या सहजासहजीच्या कृत्यामुळे नसून त्यांनी केलेल्या पराक्रमामुळेच. आणि खरोखरच त्यांनी केलेला एकेक पराक्रम म्हणजे आपल्या

इतिहासामधील सुवर्णाक्षरांनी कोरलेले पान होय. त्यासाठी त्यांना तत्कालीन परिस्थितीला आणि शत्रूनी केलेल्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागले.

शिवाजी महाराजांचा तत्कालीन बलाढ्य शत्रू म्हणजे दिल्लीपती औरंगजेब. शिवरायांना पराभूत करून त्यांना हाकलून कसे लावायचे यासाठी तो सतत धडपडत असे. आणि त्याची ही धडपड महाराजांनी आपल्या बुद्धी-चातुर्याने आणि राजकारणी मुत्सद्दीपणाने फेटाळून लावली. त्याचा कोठेही शिरकाव होऊ द्यावयाचा नाही असे धोरण महाराजांनी ठरविले होते. आपल्या बुद्धीच्या जोरावरच त्यांनी सुरत लुटली, मराठवाडा घेतला. अफझलखानाचा वध करून त्यांनी विजापूरच्या दरबारांत आपली दहशत बसवली. त्यामुळेच तर शिवरायापुढे आपली डाळ शिजणार नाही हे पाहून आदिलशहा हताश झाला. पण करतो काय ? त्याला स्वतःचे राज्य टिकवावयाचे होते. आज ना उद्या शिवाजी आपले राज्य जिंकून घेईल ही त्यांना भीति वाटत होती. म्हणून त्याने दिल्ली दरबारापुढे मदतीची याचना केली. तेव्हा दिल्लीपती औरंगजेब याने स्वतःच्या मामाला म्हणजेच शाहिस्तेखानाला शिवरायांच्यावर पाठविले. त्यासाठी तयारी तर भरपूरच केलेली होती. पाऊणलाख लष्कर, शेकडो हत्ती आणि उंट, तोफा वगैरे युद्धसाहित्याची जय्यत तयारी केली होती. प्रथम त्याने पुण्याचे आसपासचा बराचसा भाग म्हणजे शिरवळ, शिवापूर, सासवड वगैरे गांवे घेत घेत तो पुण्यात शिरला. प्रथम चाकणचा किल्ला सर केला, तेथे तर त्याने आपले बरेचसे सैन्य विखरून ठेवले होते इतकेच काय पण मुंगीलाही शिरकाव करता येणार नाही इतके सैन्य त्यांनी गोळा केले होते. एवढे करूनही तो थांबला नाही तर त्याने कोणाही हत्यारबंद मराठ्याला पुणे शहरात यायला सक्त मनाई केली.

या वेळेपर्यंत शिवाजीमहाराज गप्प होते. पण जनतेची अवहेलना व छळ पाहून त्यांनी खानाची चांगलीच खोड मोडावयाची असा निश्चय केला. त्यातच खान लालमहाल बळकावून बसला होता. वाईटात चांगले इतकेच. कारण लालमहाल हा शिवरायांच्या पूर्ण परिचयाचा होता. त्यातील खोल्या, दालने, खिडक्या, भुयारे, दारे, चोरवाटा वगैरे सर्व त्यांना माहीत होते.

आणि विशेष आश्चर्य असे की, शिवरायांचे हुशार हेर शाहिस्तेखानाच्या गोटात शिरलेले होते. त्यांनी संपूर्ण बातमी शिवरायांच्या कानावर घातली होतीच, पण खुद्द खानाने रचलेला बेतही त्यांना समजला होता आणि या सर्व गोष्टींचा विचार करून स्वत: महाराजांनी खानाच्या महालात शिरून त्याला ठार मारावयाचेच असा दृढनिश्चयी, साहसी बेत ठरवला.

त्यांनी या गोष्टीच्या पूर्ततेसाठी ५ एप्रिल १६६३ हा दिवस ठरवला होता. त्यासाठी त्यांनी पूर्वतयारीही बरीच केली होती. ते स्वत: निवडक साथीदारांसह सिंहगडावर येऊन राहिले होते. काही हुशार शिगाड्यांना शिगांना पोत बांधलेले बैल घेऊन कात्रजच्या घाटात बसायला सांगितले. सिंहगडाच्या वाटेवर चौऱ्यातून शूर लढवय्ये बसवले. आणि शेवटी सर्वांना आपआपले काम दक्षतेने करण्यासाठी बजावले.

सर्वांनी वेषांतर केले होते. ( स्वत: शिवरायांनीही शरिरावर आंतून अंगरखा, जिरेटोप, परिधान करून वरून अगदी सर्वसामान्य माणसांचा वेष घातला होता. ) बरोबर वाघनखे, बिचवा ही तीक्ष्ण आयुधे घेतली होती.

त्या सर्वांनी एक सुसंधी साधली होती. ती अशी की, एका लग्नाची वरात वाजत गाजत चालली होती. तिचा फायदा घेऊन वरात जवळ येताच शिवराय व इतर मावळे तिच्यात सामील झाले. नंतर बराच वेळाने वरात पुढे गेली व ते सर्वजण तिथेच थांबले. थोड्या वेळाने ते सर्व लालमहालाच्या भिंतीकडे सरकले. भिंती कच्च्या विटांच्या होत्या म्हणून एक भले मोठे भगदाड पाडले व ते सर्वजण आंत शिरले. यावेळी शिवरायांच्या सुदैवाने म्हणा किंवा शाहिस्तेखानाच्या दुर्दैवाने म्हणा त्याचे पहारेकरी चक्क पेंगत होते. करणार काय बिचारे ! कारण त्याच दिवशी त्यांचा रमजानचा उपवास सुटला होता. पोटांत अन्न गेल्याने बिचाऱ्यांना सुस्ती आलेली होती. आणि हीच संधी साधून शिवरायांच्या सैन्यांनी त्यांच्यातील काहीना बांधून टाकले तर काहीना ठार मारले. आणि आतील लोकांच्या कत्तलीला सुरूवात केली. तोपर्यंत शिवराय खानाच्या खोलीत शिरले. परंतु कापाकापीने अगदी गडबड उडाली होती. ते ऐकून खानही जागा झाला. काय प्रकार आहे हे पहाण्यासाठी डोळे चोळत चोळत तो निघाला तोच शिवरायांची मूर्ती पुढे दत्त

म्हणून उभी ! ती पाहून तो पुरता गोंधळून गेला व बचावासाठी खिडकीतून पळून जावे या विचाराने तो पळाला. तोच शिवरायांची तलवार त्याच्या बोटावर बसली अन् त्याची बोटे रक्तबंबाळ झाली. प्राणावर बेतले ते बोटावर निभावले ! असे म्हणून खान अगदी भांबावून गेला आणि आता पुढे काय याचा विचार करत असतांनाच महाराजांच्या इशाऱ्याच्या कर्ण्याचा आवाज ऐकल्यावर कात्रज घाटात शिंगाड्यांनी पोत पेटविले. ते पाहून खानाचे लोक तिकडे धावले. दुरून त्यांना वाटले की हेच शिवराय व त्यांचे मावळे घाटातून जात असतील. पण दुर्दैव त्यांच ! ती माणसं नसून बैल आहेत हे कळायला त्यांना बराच उशीर झाला, कारण तोपर्यंत शिवराय व मावळ्यांनी केव्हाच तेथून सिंहगडाकडे पलायन केले होते.

या गडबडीत एकूण ६० लोक गेले. शाहिस्तेखानाची तर खूपच नाचक्की झाली. त्यामुळे मोंगलसत्तेला पहिलाच जोरदार तडाखा बसला. त्यामुळे औरंगजेब संतप्त झाला. चिडून जाऊन त्याने फर्मान काढून खानाची रवानगी बंगाल प्रांतात केली. अशाप्रकारे स्वराज्यावरील एक महासंकट टळले. त्यायोगे शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याची इमारत अधिक बळकट झाली आणि अधिक डौलदार दिसू लागली.

★

# सुरतेची लूट

शाहिस्तेखानाला तुटक्या बोटाने 'तोबा तोबा' करत पळवून लावल्यावर महाराज काय थंड हवेच्या ठिकाणी विश्रांतीला गेले म्हणता ? नाव काढू नका. महाराजांचा मेंदू म्हणजे जणु असंख्य, अद्भुत कल्पना निर्माण करणारे जणु शक्तीकेंद्र !

राज्यकारभाराला पैसा हवा. मग वाढवा कर... हं, महाराजांना हे मान्य नव्हते. या सुवर्णभूमीचे शोषण करून स्वतःची तिजोरी भरून गब्बर झालेले सुरतेचे व्यापारी महाराजांना फार पसंत पडले. एकदम मन पसंत. मात्र जे लुटले ते राज्याच्या तिजोरीत. निस्पृहतेचा हा आदर्श, जगाच्या इतिहासात सांपडेल ?

बरं, हे वैभव वाहून आणायला काय रेल्वेची सोय होती का ट्रकची ? घोड्यावर एकदा मांड ठोकली की राजे तयार. घोडा फेसाटून जाई...

बरं, हे काम इतरावर सोपवून आपण नामानिराळे रहावे, कशाला लुटीचा आरोप ?

छे, असले ढोंग ढोंग्यालाच सुचायचे. म्हणून महाराज स्वतः निघाले, मावळे गरजले–

'चलो सुरत.'

वर्णन करतो आहे **प्रकाश शिंदे** १० वी.

... शिवराजांनी निर्माण केलेल्या नवमराठी राज्याचे आदिलशाही व मोंगलशाही हे दोन अत्यंत दुष्ट शत्रू होते. परंतु शिवराजांनी आपल्या राज्यात त्यांचा कधीच टिकाव लागू दिला नाही. शिवराजे आपल्या चतुर बुद्धीने

शत्रूचा कसा काटा काढीत त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी केलेली सुरतेची लूट.

लांब उत्तरेकडून येऊन दक्षिणेतील राजकारणात हात घालणारे मोंगल हे शिवराजांचे अत्यंत कट्टर शत्रू होते. शाहिस्तेखानाने तर खुद्द पुण्यास मुक्काम करून शिवराजांना त्रास दिला होता. त्यामुळे त्यांनी त्याच्यावर धाडसाने छापा घालून दहशत बसविली आणि औरंगजेबाचा सुभा हादरविला. औरंगजेबाने जो राजांचा कोंडमारा चालविला होता त्याचा सूड घेणे, मोंगली मोहिमेच्या वाढत्या खर्चाची भरपाई करून घेणे, ही राजांची सुरतेच्या लुटीमागील उद्दिष्टे होती.

दक्षिण कोकणच्या स्वारीत शिवराजांना परकीय व्यापाऱ्यांच्या संपत्तीची कल्पना आली होती. तसेच त्यांनी गुप्तहेराकडूनही माहिती काढली होती की, सुरतेला परकीय व्यापाऱ्यांच्या फार मोठ्या वखारी आहेत. सुरत हे फार मोठे व्यापाराचे केंद्र आहे, व्यापाराची उतारपेठही आहे आणि वहातुकीचे सर्वात मुख्य बंदर आहे. अशा परिस्थितीमुळे सुरत हे औरंगजेबाच्या राज्याचे नाकच आहे हे शिवराजांनी ओळखले होते. त्या ठिकाणचे कित्येक व्यापारी नवकोट नारायण होते. तेव्हा तेथे भरपूर लूट मिळेल हेही त्यांनी ओळखले आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सुरतेवरील छापा यशस्वी झाला तर त्यात मोंगलशाहीची नामुष्की होणार होती.

शाहिस्तेखानाची अप्रतिष्ठा होऊन त्याची बदली झाली होती आणि तो त्याच्याजागी नेमलेल्या 'मुअज्जम' या सुभेदाराकडे राज्यकारभार सोपवून देण्याच्या गडबडीत होता. सेनापती 'जसवंतसिंह' सिंहगडाचा वेढा घालण्यात गुंतला होता. ही संधी साधून सावकाशपणे सुरतेवर बेमालूम झडप घालण्याचा बेत महाराजांनी केला.

मंगळवार दिनांक ५ जानेवारी इ. स. १६६४ रोजी शिवराजे सुरत-नजिक आल्याची बातमी सुरतेत पसरली. शहरात पळापळ सुरू झाली. परकीय व्यापाऱ्यांनी आपल्या वखारींचा बंदोबस्त केला, परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे मोंगलांचा सुभेदार भेदरून किल्ल्यात जाऊन बसला. वाटेत आपल्या या कटाचा कोणाला संशय येऊ नये म्हणून महाराजांनी 'आम्ही

बादशहाच्या पदरीचे सुभेदार आहोत ' असा बहाणा केला. या युक्तीमुळे ते अगदी सुरतेजवळ येऊन पोहोचेपर्यंत कोणीही सावध झाले नाही. बुधवारी ( जानेवारी ६ ) रोजी रात्री ते आपल्या जवानांसह सुरत शहरात शिरले. तेव्हा त्याना सुभेदार, किल्लेदार यांनी कोणीही प्रतिकार केला नाही. शिवराजांनी व त्यांच्या जवानांनी कित्येक संपत्तीमान व्यापाऱ्यांची व नागरिकांची घरे लुटली. शहराबाहेर त्यांनी तंबू ठोकला होता. त्या तंबूसमोर सोने, रुपे, मोती, हिरे यांचे ढीगच्या ढीग पडले होते. इतरही पुष्कळ संपत्ती त्यांना मिळाली होती. त्यात दुधात साखर पडण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यावर्षी सुरतेचा व्यापार विशेष भरभराटीचा होता. अशामुळे त्यांनी अफाट संपत्ती गोळा केली. ते शहर त्यांनी जसे सावकाशपणे ( बुधवार ते रविवार ) चार दिवस लूटले तसे ते तावडतोब आपल्या जवानांसह व लुटीच्या सपत्तीसह स्वराज्यात परतले. त्यांनी केलेली लूट एक कोटीची असावी असा अंदाज केला जातो.

शिवराजानी ' बादशहाच्या सुरतेची सुरत घेतली ' असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ति मुळीच नाही. कारण सुरतेसारखे सधन शहर, व्यापारी नौकानयनाचे मुख्य केंद्र, खुद्द औरंगजेबाचे सैन्य मराठ्यांच्या छातीवर बसलेले असतांना लुटणे हा काही साधासुधा पराक्रम नाही. या घटनेनंतर सुरतेवर महाराजांची दहशत निर्माण झाली. लोकांच्या मनात त्यांच्या बद्दलच्या अनेक विस्मयकारक व भीतिदायक कल्पना निर्माण झाल्या. त्यांच्या या पवनगतीच्या हालचाली पाहून कित्येकांनी तर ' त्यांचे शरीर हवामय आहे, त्यांना पंखही आहेत ' असा ग्रह करून घेतला. यापेक्षा गमतीची गोष्ट म्हणजे सुरतेला राहून शिवराजांच्या रागाला बळी पडण्यापेक्षा शिवराजांच्या शेजारी मुंबईला राहाणे इंग्रजांना अधिक सुरक्षित वाटले आणि त्यांनी आपला सुरतेचा सर्व व्यवहार मुंबईला आणला.

★

# आग्र्याहून सुटका

" कभी सुख है, कभी दु:ख है, इसिका नाम दुनिया है. "

महाराजांच्यावरही दु:खाचे प्रसंग आले. दु:खाचे असले तरी महाराज नेहमीच त्यावर मात करत. पण आला प्रसंग तो अपमानाचा, अवहेलना जाणून बुजून...

नजर कैद. भोवती कैक हजार मोंगलांचा पहारा. देश दूरचा. माणसे मोजकी...

वाघाला पिंजऱ्यात कोंडल्यावर तो रागाने, अस्वस्थ, फेऱ्या घालत गर्जना करतो...

महाराजांना तेही करायचे नव्हते.

बाकी अभिनयाचे पहिले बक्षिस द्यायचे ठरले तर महाराजांनाच द्यावे लागेल. असा उत्कृष्ट नट, सोंगाड्या, बहुरुपी दुसरा कोणी नाही.

काय नाटक, काय आजारपणाचा सोहाळा... वा वा, काय मिठाई दान...

८ वी मधील **कु. इरावती ओगले** महाराजांचा झालेला अपमान कसा रागाने सांगत आहे व महाराजांनी करून घेतलेली सुटका कशी कौतुकाने सांगत आहे पहा–

... दि. ५ मार्च १६६६ रोजी महाराज निघाले. आग्र्यास औरंगजेबाकडे निघाले. औरंगजेबाच्या ५० व्या वाढदिवसास निघाले. म्हणजे ससा वाघाकडे निघाला.

महाराज आता आग्रा शहराच्या दक्षिणेस सुमारे ३ कोसावर आले होते. ही बातमी आग्रा शहरात सर्वत्र पोहोचली. सर्वत्र गडबड उडाली.

आज औरंगजेबाने शिवाजी महाराज व त्यांच्या सारखेच (औरंगजेबास शरण न आलेले) इतर पाहुणे यांना भूलवून, लाजवून शरण आणण्यासाठी आपल्या संपत्तीचे प्रदर्शनच मांडले होते. आज औरंगजेब कधी नव्हे ते हिरे, मोती, सोने, चांदी यात नटून बसला होता.

महाराज आग्र्यात जवळच आल्यावर रामसिहने आपला नोकर मुनशी गिरिधरलाल यास महाराजांच्या स्वागतास पाठवले. खरे म्हणजे अशा थोर पुरुषांच्या स्वागतास बादशहाच्या प्रतिनिधीने वस्त्रालकार घेऊन जायचे. पण... पण आज महाराजांच्या स्वागतासाठी बादशहाचा अडीच-हजारी सरदार 'कुंवर रामसिह' याचा एक नोकर महाराजांच्या स्वागता-साठी ? ही महाराजांची किमत औरंगजेबाने केली ! महाराजांना हा अपमान वाटला. पण तो त्यांनी पहिलाच अपमान म्हणून सहन केला.

जाणूनबुजून महाराजांना धर्मशाळेत उतरविले. पुन्हां अपमान ! खरे म्हणजे महाराजांना एका सुंदर हवेलीत किवा सरदाराच्या बंगल्यात उतर-वायचे. पण आज ? महाराजांना कळले औरंगजेबाने जाणुनबुजूनच सर्व केले.

दि. १२ मे १६६६. बादशहाचा ५० वा वाढदिवस. महाराजांच्या स्वागतासाठी औरंगजेबाने रामसिह व मुखलीसखान यांना ज़ायला सांगितले. तसेच रामसिहाकडे शाही महालाभोवती फौजेसह पहारा देण्याचेही काम दिले. रामसिह तेथेच अडकून पडला.

सकाळी १० वाजले. मुख्य व्यक्ती तर यावेळीच येणार होती. रामसिह निघाला तेव्हा दरबार चालू होता. महाराज दरबार चालू असताना येणे अशक्य होते. तेजसिह कुंवर हा महाराजांबरोबर होताच. त्याने रामसिह व महाराजांना एकमेकांची ओळख करून दिली. रामसिहाच्या हवेलीजवळच महाराजांच्या रहाण्याची व्यवस्था तंबूमध्ये केली होती. महाराजांना विश्रांती घेण्यास वेळही झाला नाही. ते निघाले, तेव्हा दरबार संपत आला होता.

महाराज किल्ल्यात पोहोचले, तेव्हा दिवाण–ई–आम मधील दरबार संपला होता आणि नेमका हाच दरबार औरंगजेबाने प्रदर्शनास ठेवला होता. नंतर दिवाण–ई–खास मध्ये पद्धतीप्रमाणे दरबार भरला. हा दरबारही

महत्त्वाचा होता. पण हाही दरबार महाराज पाहू शकले नाहीत. औरंगजेब निराश झाला.

नंतर घुशलखान्यातील दरबार भरला. तेव्हा मात्र महाराज दरबारात आले. महाराज दरबारात आले ! औरंगजेबाच्या शब्दात 'पहाडी काळा उंदीर' आला. औरंगजेबाच्या चेहऱ्यावर काहीच भाव नव्हते. मनात असतीलच ! वाघ सशाला मारायचा विचार करतो. औरंगजेबही तसाच विचार करीत असेल.

महाराज व संभाजीराजे औरंगजेबाकडे गेले आणि आणलेला नजराणा रीतीनुसार बादशहापुढे ठेवला. आणि... आणि तीनदा मुजरा केला. होय, पण त्यातला पहिला होता जिजामाईसाठी, दुसरा होता शहाजीमहाराजांसाठी आणि तिसरा होता शंभुशंकराला. पण सर्व मनातल्या मनात.

तेवढ्यात बादशहांनी महाराजांना व शंभुराजांना ५ हजारी सरदारांच्या रांगेत उभे केले.

पानसुपारीचे तबक फिरू लागले. महाराजांनाही ती मिळाली. नंतर मानाची खिलत देण्यात आली ती काहीजणांनाच देण्यात आली व महाराजांच्या सैन्यास भिऊन पळणाऱ्या आणि आता महाराजांकडे उभे राहिलेल्या जसवंतसिंह राठोडलाही मिळाली. अपमान ! अपमान ! अपमान ! किती ? किती अपमान अजून व्हावयाचे आहेत ? महाराजांचा खरा स्वभाव उफाळून आला आणि... आणि भूकंपाचा हादरा बसवणारी सिंहगर्जना सर्वांना ऐकू आली, 'रामसिंह ! हमसे भी आगे ये कौन खडा है ?' आता बहुतेक अपमानाची पाळी होती औरंगजेबावर. वास्तविक दरबाराचा नियम होता बादशहापुढे कोणी हसायचे नाही, बोलायचे नाही, बसायचे नाही, बादशहाचा अपमान होईल ना ? रामसिंह आला व त्यांनी महाराजांना शांत करण्याचा प्रयत्न केला. पण महाराज जास्तीच रागावले. औरंगजेबाकडे पाठ करून दरबारातून निघून गेले. बादशहाकडे पाठ फिरवली. बादशहाचा अपमान झाला.

महाराजांनी सांगितले, 'तुमच्या बादशाला व्यवहार समजत नाही. मी चुकूनही त्या बादशहाकडे येणार नाही. फार तर शंभुराजास रामसिंह

रोज घेऊन येईल, आणि वाटलं तर काही दिवसांनी मीही येईन.' यातील काही खरे होते, तर काही साफ खोटे. औरंगजेब चांगलाच चिडला. त्यात भर सरदार व नात्यागोत्याची माणस यांची. शिवाजी महाराजांना मारायचे हा बेत ठरला. बातमी रामसिंहास कळली. तो बादशहाकडे ( बक्षीमार्फत ) गेला. आवर्जून सांगितले. रामसिंहाने महाराजांना वाचविले. स्वराज्याला वाचविले. पण बंधनात मात्र अडकविले. रामसिंहाने शिवाजीराजांचा जामीन घेतला होता. महाराजांनी रामसिंहास 'मी पळून ( आग्र्याहून ) जाणार नाही.' असे वचन दिले व स्वत:ला बंधनात अडकविले. आता औरंगजेबाने शिवाजीराजांस स्वारीवर पाठवायचा बेत केला. म्हणजे वाटेत खून करून 'शिवाजी लढाईत मेला' असे उठवायचा बेत केला. रामसिंहाने ते ओळखले. औरंगजेबाने शिवाजीस कोणकोणती वचने दिली आहेत असे विचारणारे मिर्झाराजांना पत्र पाठविले. पत्र येण्यास दीड महिना लागणार. त्यामुळे महाराजांना पाठविण्याचा बेत पुढे ढकलला, म्हणजे मृत्यूच पुढे ढकलला.

महाराजांनी खूप शोक केला. मासाहेबांना ही बातमी कळली. शोक आवरेना. शेवटी त्यांनी आई भवानीचा धावा केला.

आता सुटायचे कसे ? महाराजांच्या निवासस्थानास सगळीकडून वेढा होता. महाराजांना युक्ती सुचली. युक्तीनेच महाराज इतरांवर जय मिळवत. मला वाटतं महाराजांच्या डोक्यात बुद्धी आणि युक्ती यांचा, सोन्याच्या खाणीसारखा खजिना होता.

महाराजांनी अर्ज केला की माझ्या फौजेस मी रजा देऊन घरी पाठवू इच्छितो. औरंगजेबास ही गोष्ट एकदम पसंत पडली. अर्ज मान्य झाला. पण यावर ४८ दिवस विचार करूनच परवाने दिले. आता महाराजांनी रामसिंहास माझ्या जामिनातून मुक्त हो असा लकडा लावला. पण तो सरळ साधा मनुष्य ऐकेना. शेवटी महाराजांनी त्याच्या ताब्यातून मला हलवा असा अर्ज केला, पण परवाना मिळाला नाही.

औरंगजेब स्वत:च मोहिमेवर जाणार होता, तेवढ्यात मिर्झाराजांचे रामसिंहास पत्र आले की, तू शिवाजीची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊ

नकोस. औरंगजेबाचा बेतही रहित झाला. बादशहाच तो ! आता रामसिहाने टुमणे लावून स्वत:ला महाराजांच्या जामिनातून मुक्त करून घेतले.

महाराजांना आता पैशाची जरूरी होती. रामसिहाकडून त्यांना तो मिळालाही. पुढे महाराजांच्या खजिन्यातून त्याला ही रक्कम परत मिळाली. महाराजाजवळ थोडी फौज होती, पण महाराज काहींना रजा देणार होते.

इकडे औरंगजेबाचा नवा विचार सुरू झाला. आग्र्यात फिदा–इ–हुसेन या सरदाराच्या वाड्यात तो वाडा पुरा झाला की गुपचुप महाराजांना त्यात पुरून टाकायचे. महाभयंकर विचार !

महाराजांना आता कैद होऊन सुमारे पावणेदोन महिने झाले होते. आषाढ उगवला, पावसाच्या वाकड्या तिकड्या सरी पडू लागल्या होत्या. महाराजांच्या डोक्यातही विचारांच्या वाकड्या तिकड्या सरी पडत होत्या.

महाराज आजारी पडले ! पोटात दुखू लागले ? दवापाणी करण्याची जरूरी होती. ठरल्याप्रमाणे गडबड उडाली. वैद्य हकीम आले. आजाराचे कारण सापडेना, का आणि कसे सापडणार ? महाराजांना काय होत होते ? काही नाही ! महाराज ठणठणीत होते. पण खेळ बहुरुप्याचा चालला होता. महाराज जगण्याची आशा दिसेना. महाराजांनी आता मायेच्या लोकांना दानधर्म करण्याचे, तसेच मेवामिठाईही आग्र्यात सर्वत्र पाठविण्याचे ठरविले. फुलादखान व औरंगजेबाचीही हरकत नव्हती. असेच काही दिवस गेले. एकेदिवशी मिठाईचे पेटारे आले. लांबीरुदी बरोबर होती. पेटारे हमालांच्या खांद्यावरून बाहेर पडले. तपासण्या झाल्या. पुढे गेले. काहीच घडले नाही. रोज पेटारे तपासणी झाल्यावर पुढे जात.

आज १३ ऑगस्ट १६६६. श्रीकृष्णाचा जन्मदिवस. पेटारे आले, पण त्यातील दोन रिकामे होते. शिवाजीराजे व शंभुराजे त्यात बसले. पेटारे बंद झाले. महाराजांच्या जागी हिरोजी फर्जंद झोपला. त्याची अंगकाठी महाराजांसारखीच होती. महाराजांनी उजव्या हातातील सोन्याचे कडे हिरोजीस दिले. तो डोक्यावरून, अंगावरून शेला पांघरून झोपला. सोन्याचे कडे असलेला उजवा हात बाहेर ठेवला. मदारी मेहत्तर पाय चेपू लागला.



पेटारे निघाले. तपासणी करण्यास सुरवात झाली. दोन पेटारे तपासले. महाराजांच्या सुदैवाने पुढील पेटारे तपासले गेले नाहीत. आता शिवाजीला मारायचा आनंद औरंगजेबास मिळणार नव्हता. बिचारा ! तिकडे आनंदात होता.

इकडे थोड्या वेळाने महाराज आग्र्याबाहेर पोहोचल्यावर ठरल्या-जागी पेटारे थांबले. घोडे तयार होते. दरमजल सुरू झाली. हिरोजी महाराजांचे औषध आणायला गेला व जाताना महाराजांच्या आकाराचे लोड मांडून त्यावर शेला पांघरला.

इतकी सामसूम कशी ! म्हणून पहारेकरी आत जातात तो पत्ता नाही ! शोधाशोध झाली. शहर धुंडाळले. पण छे ! खबर नाही ! तोपर्यंत महाराज मथुरेस पोचले व मोरोपंत पिंगळ्यांच्या मेव्हण्याकडे उतरून शंभुराजांना तेथे ठेवून संन्याशाचे सोंग घेऊन कफन्या, कुबड्या, यांच्यात जडजवाहिरे ठेवून निघाले. तीर्थक्षेत्रे करत पण कुठेही न थांबता चालत राहिले.

महाराजांना आता महाराष्ट्र दिसू लागला. महाराष्ट्रात आलेही ! राजगडावर त्या दिवशी संन्याशांची टोळी आली व पहारेकऱ्यांना 'आत जाऊ दे ' म्हणू लागली. त्यांना जिजामाऊलींना भेटायचे होते. संन्याशी म्हटल्यावर परवानगी मिळाली ! महाराजांना आईसाहेब भेटल्या ! ओळख पटली ! पण वाईट बातमी ऐकू आली. शंभूराजे वाटेत वारले ! मुद्दामच वारले होते. पण मथुरेत ते सुखरूप होते.

१५ ऑगस्ट १६६६ रोजी महाराज पूर्णपणे औरंगजेबाच्या कैदेतून निसटले ! वाघाच्या हातून ससा निसटला ! !

★

# राज्याभिषेक सोहळा

आणि आता दुसऱ्या अभूतपूर्व वैभवशाली सोहाळ्याचे वर्णन करत आहे ९ वी मधील **दिलीप कांबळे.**

का, कुठे, कसा... ?

दानधर्म किती केला ?

धार्मिक विधी कोणते केले ?

ब्राह्मण, मराठा, क्षत्रिय, दलित... सर्व एकत्र येऊन साजरा झालेला सोहळा.

याचा परिणाम काय झाला ? राजाचे प्रजेसंबंधी धोरण कसे होते ? कोणाला आश्रय, कोणाला शिक्षा ? राज्य-सिंहासनावर बसायचा अधिकार कोणाला ? त्याची पथ्ये कोणती ?

ह्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे यंदा साजरा होत असलेल्या त्रिशताब्दी समारंभानिमित्त शोधली पाहिजेत, नाही का ?

नाही तर सारे फुकटच की ! प्रश्न निर्माण झाले पाहिजेत, उत्तरे शोधायचा प्रयत्न केला पाहिजे.

या भरतभूमीबद्दलचे प्रेम, अभिमान दाटून आला पाहिजे.

मन:चक्षूंनी तो सोहळा अनुभवता आला पाहिजे. त्या काळाशी समरस होऊन गेले पाहिजे. समोर उभे ठाकावेत साक्षात् महाराज...

... ते मंत्रशक्तीरुप शब्द—

" हर हर महादेव. "

... दि. ६ जून १६७४ रोजी घडलेल्या एका घटनेने महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. ही घटना अभुतपूर्व, क्रांतीकारक

तर आहेच, परंतु या घटनेमुळे महाराष्ट्राच्या इतिहासाला एक प्रकारची कलाटणी मिळून भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचा प्रवाहही बदलला. तसेच या घटनेमुळे हिंदवी स्वराज्य निर्मिण्यासाठी लक्षावधी लोकांना प्रेरणा मिळाली. ती घटना म्हणजेच मराठी साम्राज्याचा जन्मदाता छत्रपति शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा होय.

याच दिवसापासून दिव्य, भव्य व्यक्तिमत्वाच्या शिवबाने महाराष्ट्र देशाचा दिव्य, भव्य डोलारा स्वशिरावर घेतला आणि मराठी धर्माला राजा मिळाला, महाराष्ट्राच्या पीडित जनतेला स्वहक्काचा, चिरकालीन आधार-स्तंभ गवसला !

याच क्रांतिकारक घटनेमुळे महाराष्ट्रावर होणाऱ्या आक्रमणांना थोपविण्यासाठी, स्वराज्य स्थापन करण्यासाठी आणि पुढे ते टिकविण्यासाठी एक प्रकारची दिव्य शक्ती महाराष्ट्रीयांत निर्माण झाली.

महाराजांना त्याकाळी एखाद्या सुलतानाच्या अगर राजाच्या पदरी आपल्या वडिलांप्रमाणे नोकरी पत्करून ऐषारामात दिवस घालविता आले असते. परंतु परकीयांच्या गुलामगिरीत राबण्यापेक्षा स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन करून राहणे महाराजांच्या स्वाभिमानी मनाला अधिक मानवणारे होते. पण एक छोटासा मराठा सरदार स्वतःला राज्याभिषेक करून घेऊन स्वतंत्र सत्ताधीशाचा दर्जा प्राप्त करून घेऊ इच्छितो ही गोष्ट तत्कालीन प्रतिष्ठितांना समजू शकली नाही, सहन होऊ शकली नाही. त्यांनी या राज्याभिषेकास कडकडून विरोध केला. महाराजांची मुंजही झालेली नव्हती व त्यांचे विवाह ही समंत्रक झालेले नव्हते. यासाठी काही विद्वान पंडितांनीही महाराजांना विरोध केला. परंतु महाराजांनी या विरोधास जुमानले नाही, कारण त्यांना आपल्या मातोश्रींच्या इच्छेची पूर्तता करायची होती. जिजाबाईंचे नेत्र शिवबाचा राज्याभिषेक पाहण्यासाठी आसुसले होते. काशीचे विद्वान ब्राह्मण गागाभट्ट यांनीही महाराजांना राज्याभिषेक करून घेण्या-विषयी सल्ला दिला.

राज्याभिषेकापूर्वी महाराजांना मोंगल व इतर शत्रू राजे 'राजा' मानायला तयार नव्हते. त्यांच्या मते शिवाजी हा एक छोटासा सरदार आहे.

त्याचप्रमाणे महाराजांपुढे स्वराज्य स्थापनेचे जे स्वप्न आकार घेत होते, त्याच्या पूर्ततेसाठी राज्याभिषेकाची अत्यावश्यकता होती. महाराष्ट्रीयांना छळणाऱ्या बादशहांना महाराष्ट्रातील जनता बेवारशी नाही, तिचा रक्षणकर्ता महाराष्ट्रात आहे ही गोष्ट महाराजांना पटवून द्यावयाची होती. त्यावेळी महाराजांच्या पत्रकाला राजपत्रकाचा मान नव्हता, त्यांची आज्ञा राजाज्ञा मानली जात नव्हती व मुख्य म्हणजे स्वराज्य स्थापन झाले आहे हे जग-जाहीर व्हावे सर्वांनी स्वराज्यास मान्यता द्यावी यासाठी दूरदृष्टीने महाराजांनी राज्याभिषेकाची योजना आखली.

या समारंभासाठी महाराजांनी रायगडासारखा अभेद्य दुर्गम किल्ला निवडला. रायगड ही त्यांची राजधानीची निवड योग्य होती. रायगडावर धन, धान्य, पाणी उदंड होते. शत्रूस प्रवेश करण्यास अत्यंत कठीण अशी रायगडाची रचना होती.

रायगडावर अश्वशाला, गजशाला, बाजारपेठ, भव्य राजवाडा, नगारखाना, गोशाला, अठरा कारखाने, बारा महाल बांधले. या सर्व सोयींनी रायगड ही खऱ्या अर्थाने, राजधानी म्हणून शोभू लागली. राज्याभिषेक सोहळ्याच्या आकर्षणात याची आणखीनच भर पडणार होती.

महाराजांनी ब्राम्हण व पडितांकडून राज्याभिषेकाच्या कार्यक्रमांचे मुहूर्त निश्चित केले. हा मंगलविधी सात दिवस चालणार होता.

प्रथम गागाभट्टांनी महाराजांचा उपनयन संस्कार क्षात्रपद्धतीने केला व त्यांना क्षत्रियांच्या गायत्री मंत्राचा उपदेश केला. त्यानंतर महाराजानी आपल्या राण्यांबरोबर समंत्रक विवाह केला, कारण त्यांचे पूर्वी झालेले विवाह विशुद्ध क्षत्रियाप्रमाणे वैदिक संस्कारांनी झालेले नव्हते. हा विवाहाचा कार्यक्रम शनिवार दिनांक ३० मे १६७४ रोजी झाला.

जेष्ठ शुद्ध एकादशीस तुला कार्यक्रम झाला. महाराजांची सुवर्ण, चांदी, तांबे, कापूर, साखर, लोणी, फळे, मसाला वगैरे पदार्थांनी तुला करण्यात आली व ते सर्व पदार्थ दान करण्यात आले.

नंतर महाराजांनी दुसऱ्या दिवशी मातोश्रीस नमस्कार करून मंगलस्नान केले. शुभ्रवस्त्रे, गंधपुष्प व अलंकार परिधान केले. राज्याभिषेकापूर्वी ग्रहशांती, ऐंद्रीशांती, नक्षत्रशांती, पौरंदरीशांती हे शास्त्रीय विधी झाले. महाराजांनी निमंत्रित हजारो पाहुण्यांची जेवण–खाण्याची व राहण्याची व्यवस्था मोठ्या कौशल्याने केली. इतक्या लोकांची सात दिवस व्यवस्था करणे म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे.



यानंतर मुख्य राज्याभिषेक समारंभास शुक्रवारी सूर्यास्ताचे वेळी सुरुवात झाली. हा कार्यक्रम रात्रभर चालला. शनिवारी पहाटे सिंहासनारोहण झाले. गणेशपूजन, स्वस्तिपूजन, मातृकापूजन झाले. महाराज सपत्नीक मंडपात आल्यानंतर मंडपपूजा करण्यात आली. सर्वप्रथम होम झाला.

महाराजांनी सुगंधी तेले, चूर्णे व उष्णोदकांनी समंत्र स्नान केले. महाराजांनी शस्त्रास्त्रांची पूजा केली व ती शस्त्रे धारण केली.

यानंतर महाराजांनी सुवर्णजडित व बत्तीस मण सोन्याच्या सिंहासनावर सिंहासनाला पदस्पर्श न होऊ देता विधिपूर्वक आरोहण केले. त्यांच्यावर सप्तसिंधूंच्या पवित्र जलांचा अभिषेक करण्यात आला. लगेच

सोळा सुवासिनी व सोळा कुमारिकांनी महाराजांना ओवाळले. पुन्हा त्यांना सुवर्णस्नान घालण्यात आले. नजराणे अर्पण करण्याचा कार्यक्रम झाला. गागाभट्टांनी हिऱ्या, पाचूंनी मढविलेले राजमुगुट महाराजांच्या मस्तकावर ठेवले. पुरोहितांनी महाराजांवर सुवर्णपुष्पे उधळली. याचक्षणी भेरी, मंगलवाद्ये निनादू लागली. स्वराज्यातील सर्व गडावरून तोफांची सरबत्ती झाली आणि शिवाजी महाराज हे छत्रसिंहासनाधीश्वर व संस्कारयुक्त राजे झाल्याचे गागाभट्टांनी उच्च स्वरात घोषित केले. अमात्य मंडळाने महाराजांना आपला अभिषिक्त राजा मानून त्यांचा जयघोष केला. अशा-प्रकारे धर्माला राजा लाभला आणि श्री रामचंद्राचे सिंहासन पुनरुज्जीवित झाले.

★

# महाराजांची सैन्यव्यवस्था

राष्ट्राची खरी संपत्ती म्हणजे सैन्य, जसा पाया भुसभुशीत असला की इमारत... ? वाटच– भुस्कट होऊन जाईल.

महाराजांनी हे सैन्याचे महत्त्व, आवश्यकता फार चांगली जाणली होती. सैन्य म्हणजे चार शिपाई गडी जमवून, त्यांना पगार देऊन बाजारी, सिनेमात आणतात, तसे सैनिक गोळा करून ठेवणे नाही. पोटापेक्षाही त्यांची मने घडवणे महत्त्वाचे होते आणि अवघड ! लढायचे ते पोटासाठी नाही, या भूमीसाठी– या भूमीच्या राजासाठी...

हे करताना स्वत:तली माणूसकी विसरायची नाही.

सैनिक म्हणजे राक्षस नव्हे, शत्रूच्या बाबतही...

म्हणून बायकांच्यावर, मुलांवर, वृद्धावर अत्याचार करायला मराठी सैन्य अधीर नसे, की लूट स्वत:च्या घरी नेण्याची हाव नसे.

महाराजांचे सैन्य... एक एक माणूस म्हणून महत्त्वाचा– त्यांचे नियम कडक– घोड्याची पारख बिनचूक– शस्त्रे शक्य तो गरज भागवणारी– पगार नियमित– काळजी आई घेणार नाही इतकी...

हा अवघड विषय हाताळला आहे ९ वी मधील **कु. शोभा बढे** हिने...

यद्यप्यल्पतरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
पुरुषेणासहायेन किम् राज्यं महोदयम् ।।

... **काम** लहानसे असले तरी ते एकट्याच्याने पार पाडणे कठीण असते, मग राज्यासारखे महत्कार्य एक माणूस दुसऱ्याच्या मदतीवाचून कसे करणार ?

शिवाजी महाराजांना तर शतकानुशतके पारतंत्र्याच्या गर्तेत पिचत पडलेल्या जनतेला स्वराज्याचा कानमंत्र देऊन स्वतंत्र हिंदवी स्वराज्याची स्थापना करावयाची होती. शिवाजी महाराजांनी आपले हे स्वप्न मुख्यत: लष्करी सामर्थ्यावरच साकार केले. जगातल्या अद्वितीय सेनानीमध्ये शिवाजी महाराजांची गणना होते. शिवाजी महाराज एक कुशल संघटक होते. राजाचे बळ त्याच्या सैन्यात व साथीदारात असते. सैन्याविना राष्ट्र हे प्राणहीन शरीरासारखे आहे हे शिवाजी महाराजांनी ओळखले व आपली सैन्यव्यवस्था उत्तम ठेवली.

त्यांच्या सैन्याचे पायदळ, घोडदळ, नौदल आणि गुप्तचर दल असे मुख्य विभाग होते, त्याखेरीज हत्ती व उंट यांचाही उपयोग त्यांनी आपल्या सैन्यात करून घेतला.

**पायदळ**– पायदळात दहा पाइकांचा एक गट व त्यावर एक नाईक असे. अशा पाच गटावर एक हवालदार व दोन तीन हवालदारावर एक जुमलेदार, दहा जुमल्यावर एक हजारी व सात हजाऱ्यावर एक सरनोबत अशी व्यवस्था असे.

**घोडदळ**– ' यस्यस्ति अश्व: तस्यास्ति मेदिनी । ' हे घोड्याचे महत्त्व महाराजांनी चांगले ओळखले होते. भीमथडी तट्टे सदा सर्वकाळ मोंगलाशी झुंज देण्यास समर्थ ठरणार नाहीत म्हणून भव्य, उत्तम अरबी घोडेही महाराजांनी खरेदी केले होते. घोडदळात बारगीर व शिलेदार असे दोन वर्ग असत. बारगीरापाशी घोडा व हत्यार सरकारी असे. शिलेदारापाशी स्वत:चाच घोडा असे शिलेदार युद्धप्रसंगी आपल्याबरोबर स्वखर्चाने हवे तितके स्वार घेऊन येई. बारगीर पागेच्या दिमतीस असे. त्याच्यापेक्षा शिलेदार कमी दर्जाचा. शिलेदारावर हुकमत पागेची पंचवीस बारगीरावर एक मराठा धारकरी हवालदार. पाच हवालदाराचा एक जुमला अशी व्यवस्था असे.

**नौदल**– शिवाजी महाराजांना भारतीय आरमाराचे जनक असे म्हणतात. त्या काळामध्ये हिंदुस्थानातील कोणत्याही मोंगल राजांची

सागरावर सत्ता नव्हती. पोर्तुगीज, डच, इंग्रज या पाश्चिमात्य लोकांचेच सागरावर वर्चस्व होते. पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय भारताची कोणतीहि नौका समुद्रावर संचार करू शकत नसे. परंतु कल्याण, भिवंडी, पनवेल येथे महाराजांनी आपल्या युद्धनौका बांधल्या आणि महाराजांच्या प्रभावासमोर पोर्तुगीजांना नमते घ्यावे लागले. या नौका फार मोठ्या नाहीत आणि फार लहान नाहीत, अशा मध्यम आकाराच्या होत्या. त्या नौकांवर तोफा, बंदुका, दारुगोळा सदैव सुसज्ज असे. त्यावर शूर, धैर्यशील व सुयोग्य योद्धे असत. युद्ध नौकांच्या संघटनेचे स्वरूप साधारण याप्रमाणे असे– पाच गुराबा व पंधरा गलबते मिळून एक सुभा. सर्व सुभ्यांच्या वर एक सरसुभा. हाच नाविकदलाचा सर्वात मोठा अधिकारी होता. सभासदाच्या मते महाराजांनी सहा प्रकारच्या नौका करविल्या. त्यांची नावे– गुराबा, गलबत, शिबाडे, तरांडी, तारवे आणि पगार. महाराजांनी आरमाराच्या निर्मितीस हात घातला त्यावेळी ते अवघे २९ वर्षांचे होते. थोड्याच कालावधीत मराठी आरमार इंग्रज, पोर्तुगीज व हबशी यांच्याशी टक्कर देण्यास समर्थ झाले. युद्धनौकाबरोबर जलदुर्गही महाराजांनी निर्माण केले. तसेच व्यापारी नौका उभारून समुद्र व्यापार सुरू केला. महाराजांच्या नौदलात मलबारी, कोळी व भंडारी लोकांचा भरणा होता. पद्मदुर्ग, सिंधूदुर्ग व विजयदुर्ग बांधून खोदेरी व उदेरी या दोन लहान बेटावर तटबंदी बांधून महाराजांनी नौदल भक्कम केले.

**गुप्तचर दल**– शिवछत्रपतींच्या सैन्यविभागाचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांचे गुप्तचरदल होय. शिवाजी महाराजांनी युद्धात जे अनेक दैदिप्यमान विजय मिळविले त्यापूर्वी त्यांना शत्रुसैन्याची, बळाची, सैनानायकाच्या अंत:करणाची संपूर्ण माहिती होती. ही माहिती त्यांना त्यांच्या गुप्तचरांच्या द्वारेच मिळत असे. महाराज पुष्कळदा स्वत:च हेरगिरीचे काम करत. वाटेल तो वेष धारण करून हेराचे काम करण्यास कचरत नसत. लाकडाच्या मोळ्या विकणाऱ्या अथवा गवताचे भारे विकणाऱ्याचा वेष घेऊन शत्रूच्या सैन्यात वार्ता काढण्याकरता महाराज जात असत. सुरतेला जाण्याचा जवळचा मार्ग महाराजांनी फकीराचा वेष धारण करून काढला.

महाराजांच्या पदरी जे अनेक गुप्तचर होते, त्यात बहिर्जी नाईक हा सर्वश्रेष्ठ असून सुरतेच्या लुटीच्या आधी द्रव्याची सर्व स्थाने त्याने शिवाजी महाराजांना सांगितली होती. अफझलखानाच्या स्वारीच्या प्रसंगी खानाचा तळ वाईला असताना शिवाजी महाराजांचा पाच सहस्र मावळ्यावरील अधिकारी असलेला विश्वासराव तानाजी प्रभू मुसेखोरेकर या नावाचा एक सरदार हेरगिरीसाठी तेथे नेमण्यात आला होता. हा विश्वासराव प्रतिदिनी रात्री फकीराचा वेष घेऊन खानाच्या सेनानिवासात भिक्षा मागण्यासाठी जाई व अफझलखानाचे जे खलबत चाले त्याची इत्थंभूत वार्ता तो महाराजांना देत असे. महाराज आपल्या हेरांना मुबलक द्रव्य देत व यामुळे हे हेर महाराजांना नक्की बातमी देत असत व त्याचे योगाने शिवाजी महाराजांना यश प्राप्त होण्यास सुलभ जात असे. महाराजांना रामदासांच्या शिष्याकडूनही शत्रुकडील गुप्त, महत्त्वाच्या बातम्या कळत असाव्यात असे दिसते.

तसेच व्यापारी लोकांचाही हेर म्हणून शिवाजी महाराज उपयोग करून घेत असत. वल्लभ, गंगादास नावाच्या व्यापाऱ्यांना सुरतेच्या मोंगल सरदाराने शिवाजीचा हेर म्हणून पकडले होते. विशेष म्हणजे केवळ भारतीयच नाही तर गोऱ्या लोकांचाहीं उपयोग ' हेर ' म्हणून महाराजांनी करून घेतला होता. अशा तऱ्हेने शिवाजी महाराजांचे हेर बहुजन समाजात पसरले होत.

**राजरक्षक दल**– स्वराज्याच्या मूर्धास्थानी असलेल्या राज्याच्या शरीराचे संरक्षण व विपत्तीच्या अथवा आणिबाणीच्या प्रसंगी राखीव सैन्य म्हणून हे विशेष सैन्य स्वत: शिवाजी महाराजांनी पारखून घेतलेल्या धैर्यशाली सुदृढ, आज्ञाधारक, विश्वासू आणि निष्ठावान अशा निवडक लोकांचे असे. राजाच्या शरीररक्षणाबरोबरच राज्यसभा व राजाचे निवासस्थान येथील व्यवस्थेचे व संरक्षणाचे काम या संरक्षण दलातील सेनेकडेच असे.

**सैन्याचे शिक्षण**– छत्रपति शिवाजीमहाराज आपल्या सैन्याला शिक्षण देण्यासाठी उघड्या शेतात तीन महिने तळ देत असत व घोड्यावर कसे बसावे, युद्धकलेचे सर्व डाव कसे खेळावे व लढाई कशी करावी या विषयीचे शिक्षण काळजीपूर्वक देत. बापाकडून मुलाला असे परंपरेनेही शिक्षण मिळे.

**सैनिकाचा पोषाख**– सैनिकाच्या पायात चोळणा, अंगात कुडते व डोक्याला पागोटे असा साधाच पोशाख असे.

**सैनिक**– शिवाजी महाराजांनी ज्यांच्या बळावर विजय मिळविले ते मावळे व मराठे उंचीने बेताचे, सडपातळ, काटक व चलाख असत. ते कष्टाळू व विलासशून्य असत. त्यांची स्वामीनिष्ठा वाखाणण्यासारखी होती. आपल्या राजासाठी ते प्रसंगी प्राण देण्यासही तयार असत. तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यासारख्या शिवाजी महाराजांच्या शूर आणि स्वामीनिष्ठ सैनिकांची नावे इतिहासात पदोपदी आढळतील. शिवाजी महाराजांच्या सैनिकांना हालअपेष्टांची संवय होती प्रवासात होणाऱ्या उपासमारीला ते सरावलेले होते. त्यांचे जेवणही साधे असे.

'वरी भाकरी त्यावरी एक कांदा
नसे अन्य काही शिदोरीस बांधा'

असे एका कवीने महाराजांच्या सैनिकाचे वर्णन केले आहे. अर्थात सैन्यासमोर साधेपणाच्या बाबतीतही स्वत: शिवाजी महाराजांचा आदर्श होता.

**शस्त्रास्त्रे**– शिवछत्रपतींच्या सैन्याजवळ तत्कालीन शस्त्रास्त्रातील सर्वोत्कृष्ट शस्त्रास्त्रे होती. तरवार, कटयार, जमदाडा, पट्टे, भाले, बाक, बिचवे, टाकण्या, तिरकमानी, बदूक, बरवतरे घोंग्या, टोप अथवा शिरस्त्राण, दुपट्टे, चिलखते, पारवरा, दगड टाकणारी यंत्रे इत्यादि प्रकारची शस्त्रास्त्रे होती. शिवाजी महाराजांनी पुष्कळ वेळा शस्त्रास्त्रे विकत घेतली. त्यांच्याजवळ तोफा होत्या, पण तोफखाना नव्हता.

**वेतन**– निष्ठावंत सैन्याच्या उभारणीसाठी त्या सैन्याला नियमितवेळी वेतन मिळणे व ते सर्व दृष्टीने भरपूर असणे अत्यावश्यक आहे. महाराज आपल्या सैन्याला भरपूर वेतन देत असत व सैनिकास सैन्यात घेतेवेळी जे वेतन त्यास देण्याचे ते ठरवत, ते नियमीतपणे प्रत्येक प्रतिपदेस देत असत. प्रत्येक सैनिकाला मुलकी अधिकाऱ्याकडून प्रत्यक्ष त्याचे वेतन मिळे. त्याच्या सेनाधिकाऱ्याकडून ते मिळत नसे. अधिकारी व सैनिक यांना भरपूर वेतन तेही ठरल्यादिवशी मिळत असे.

**शिस्त**– वर्षातील आठ महिने दिग्विजयासाठी बाहेर जाऊन परमुलुखात पोट भरावे व पावसाळ्यात देशाला छावणीस यावे असे स्वारीचे धोरण असे. लष्करात बायका, दासी व वेश्या नसाव्यात. जो बाळगील त्याची गर्दन छाटावी, परमुलूखातील स्त्रियांना हात लावू नये, गाय न धरावी, बैल ओझ्यास मात्र धरावा, ज्याने वस्तू चोरून ठेवली असेल त्यास शासन करावे, छावणीत येऊन काम, कष्ट, मशागत यांचा सरंजाम करावा. ज्याने बेशिस्त वर्तणूक केली असेल त्यास दूर करून कडक शासन करावे, आणि राजाच्या भेटीस दसऱ्यास जावे. महाराजांनी पारितोषिक पदव्या, धन व रत्ने माणके दिली, परंतु त्यांनी बक्षीस म्हणून भूमी दिली नाही. जर एखाद्या सैनिकाने विशेष पराक्रम केला असेल तर त्या सैनिकाला महाराज वेतनाची व श्रेणीची वाढ करत. त्यांनी सैन्यामध्ये कडक शिस्त लावली होती. महाराजांचे आपल्या अधिकाऱ्यावर प्रेम होते, ते त्यांना भावाप्रमाणे किंवा मित्राप्रमाणे वागवीत असत. आपले सैनिक नोकरी सोडून जाऊ नयेत म्हणून ते सैनिकांना ज्या प्रदेशांचे रहिवासी असतील तेथेच ठेवीत. त्यामुळे सैनिक कंटाळत नसत. सैनिकांचे महाराजांच्यावर फार प्रेम असे. ते सैनिकांच्या प्राणास जपत व त्यामुळे सैनिक महाराजांवर खूष असत.

**युद्धपद्धती**– शिवाजी महाराज उघड युद्धाऐवजी गनिमी पद्धतीचे युद्ध करत असत. यामध्ये शत्रूची रसद तोडणे, वारंवार छापे घालून त्यांचे बळ कमी करणे, त्यांना अन्नपाणी मिळू न देणे, त्यांच्या राज्यात शिरून लूटमार करणे इत्यादी गोष्टी असत. परंतु नेहमीच गनिमीकाव्याची पद्धत उपयोगी पडे असे नाही. त्यावेळी समोरासमोर उभे राहून मैदानी लढाई करण्यातही शिवाजी महाराज व त्यांचे सैनिक कचरले नाहीत.

त्यांची सैन्यव्यवस्था आजही आपल्या राज्यकर्त्यांनी कित्ता गिरवावी अशी होती. जो जो शिवाजी महाराजांच्या चरित्राचे चिंतन करावे, तो तो मस्तक नम्र होऊन जाते व मनोभावे हात जोडतात. वाटते की या स्वतंत्र भारतात शिवाजीराजांनी पुन्हा जन्म घ्यावा व भारत भरभराटीस येऊन जनता सुखी व्हावी.

★

# महाराजांची राजनीती

राजनीती !

राजकारणातील नीती !

राज्याच्या हितासाठी स्वकीय आणि परकीय, मित्र आणि शत्रू याबाबतचे धोरण.

येथे राष्ट्रहित प्रथम– व्यक्तीहित नाही. मग तो राजा असो, नाहीतर सैनिक. महाराजांची राजनीती अस्सल, निखळ अशा राष्ट्रहितावर आधारलेली होती.

राष्ट्रसेवा चोख, निस्वार्थी– मग बक्षीस.

राष्ट्रासाठी त्याग- मग बक्षीस.

राष्ट्रासाठी पराक्रम– मानाची जागा.

राष्ट्रद्रोह– तोफेच्या तोंडी.

फितुरी– मिळेल ती शिक्षा.

कोणत्याही धर्माचा, जातीचा असो, राष्ट्राशी इमान असेल तर राजे जवळ करत आणि प्रत्यक्ष नात्यातल्या माणसाने फितुरी केली तर कडक धोरण स्वीकारत.

राजा न्यायाच्याबाबत असा सदैव जागृत. तेथे लपवाछपवी नाही. सारा मामला उघड.

हे वळण शिवबाने लावले म्हणूनच ना शिवबा गेल्यानंतरही मराठ्यांनी मोंगलाना त्राही भगवान करून सोडले.

राज्यकर्त्यांनी स्वतःची प्रतिमा उजळत रहावी म्हणून प्रयत्न करून चालत नाही. जागृत केले गेले पाहिजे, केवळ राष्ट्रप्रेम.

मग

साम... दाम... दंड... भेद हा **शंकर डांगे** ( १० वी ) कसा सांगतो ते बघू जरा.

... भारतात अनेक राजांनी आपली राजसत्ता चालविली होती, त्यांची राजनीती पडताळून पहाता त्यांत शिवरायांचीच राजनीती वाखाणण्यासारखी आहे. आजही ज्यातून राजकर्त्यांना काही शिकता येईल अशी आहे.

शिवराय केवळ बारा वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांनी, शहाजी-राजांनी बाल–शिवाजीला छत्तीस गावांची जहागिरी दिली होती. ते तेवढ्या जहागिरीवरच स्वस्थ बसले नाहीत. मोंगलाकडून होणारा हिंदूवरील अन्याय अत्याचार, बलात्कार व जुलूम शिवरायांनी पाहिला होता. त्यांनी ही परिस्थिती बदलायची प्रतिज्ञा केली व स्वराज्याचे तोरण सोळाव्या वर्षीच ' तोरणा ' किल्ला जिंकून बांधले.

साम, दाम, दंड, भेद अशा चार प्रकारांनी युक्त असलेली राजनीती शिवरायांनी हाताळली होती. हे चारही मार्ग महाराजांनी वेळ–प्रसंग पाहून वापरलेले आहेत. सामोपचाराने त्यांनी जयसिंगाशी तडजोड केली होती. कित्येक किल्लेदाराना दाम म्हणजे धन देऊन ते किल्ले आपल्या ताब्यात घेतले होते. गुन्हेगारास ते कडक दंड करीत व वेळप्रसंगी शत्रूसैन्यात भेद निर्माण करून म्हणजेच त्यांच्यात फूट पाडून स्वाऱ्या जिंकीत असत.

जेव्हा शिवराय अवतीभोवतीचे प्रदेश ताब्यात घेत, तेव्हा ते प्रथम तेथील जनतेला आपणापासून अभय देत. त्यांना घरे बांधावयास, तळी-विहिरी खोदावयास व बगीचे उभारण्यास सांगत व स्वतःहून मदत करत. जिंकलेल्या भागावर एक सुभेदार नेमीत. कित्येकदा आपण कोण आहोत हे कळू न देता, शिवराय त्यांच्यात मिसळत व आपलीच खोटी निंदा करून शिवरायां-विषयीचे लोकमत समजावून घेत. कांही महत्त्वाच्या बाबी असतील तर त्या कागदावर लिहून घेत व त्यांवर पुन्हा विचार करून, थोरांचा सल्ला घेवून निर्णय करीत

शिवराय गुणी माणसांना बक्षीसे व गुन्हेगारांना त्यांच्या गुन्ह्या-प्रमाणे हटकून शिक्षा करीत. त्यामुळे शिवरायांवर सर्व शूर, वीर, मावळे व सज्जन प्रेम करीत. शिवरायांना प्रजेविषयी अतिशय काळजी असे. ते उत्तम प्रजापालक होते. आपल्या स्वराज्याचे सुराज्य कसे होईल यांकडे महाराजांचे विशेष लक्ष असे; आणि त्यांनी तसे केलेही. जनहिताच्या दृष्टीनेच योग्य

कायदे–कानू शिवरायाकडून केले जात व कोणाकडूनही ‘ कायदाभंग ’ होऊ नये, यावर सक्त नजर ठेवीत, कायदाभंग करणाऱ्याला शिक्षा ही ठरलेलीच ! ‘ शिवरायांच्या राज्यातून प्रवास करणाऱ्यास आपल्या रयतेकडून कसलाही उपसर्ग पोहोचू नये ’ अशी शिवरायांची आज्ञा असे.

शिवराजांनी स्वराज्यात निःपक्षपाती राज्यपद्धती ठेवली होती. कोणावरही आणि कसल्याही प्रकारचा अन्याय अथवा जुलूम झालेला त्यांना खपत नसे. यासाठी त्यांनी निरनिराळी न्यायकेंद्रे काढली होती. सर्वात खालचे न्यायकेंद्र ‘ ग्रामपंचायती ’ हे असायचे व सर्वोच्च न्यायकेंद्र म्हणजे ‘ राज्यमंडळ. ’ या पंचायतीची सभा देवालयात, नदीतीरी किंवा अशाच पवित्र ठिकाणी भरत असे. राज्यमंडळाचे सभासद स्वतः राजा (शिवराय), धर्मशास्त्रज्ञ व व्यवहारज्ञ हे असत. शिवराय कोणतीही फिर्याद एकान्तात ऐकत नसत किंवा त्याचा निर्णयही एकटे देत नसत. निर्णय देतांना ते थोरांचा व चांगल्या लोकांचा आणि व्यवहारज्ञ–धर्मशास्त्रज्ञ यांचा सल्ला घेत. स्वराज्यात मुस्लीमांची संख्याही बरीच होती. मात्र ते सुद्धा पंचायतीच्या निर्णयाला मान देत.

शिवकालाअगोदर हिंदू लोक मुसलमानांचे पूर्णपणे गुलाम बनले होते. त्यावेळी कोणाची धाड येईल आणि घरादारावरून गाढवांचा नांगर फिरेल याचा कांही नेम नव्हता. कारण त्यांचे जीवन अनिश्चित होते, शिवरायांना या गोष्टीचे पूर्णपणे ज्ञान लहानपणीच झाले होते. मोंगलाची स्वारी म्हणजे प्रजेला धाक वाटे. परंतु महाराजांची स्वारी म्हणजे मोलाची भेट असे, नवीन चांगल्या जीवनाची आशा वाटे आणि ती पूर्णपणे पूर्ण होत असे.

मुस्लीम राज्यकर्ते ‘ वरच्यांचे पाय चाटा आणि खालच्यांना लाथा मारा ’ असे करीत. पण शिवरायांचे या उलट होते, त्यांनी बादशाही अंमलदारांना लाथा मारल्या व प्रजेला अभय दिले.

शिवरायांनी भारताबाहेरील राष्ट्रांना स्वराज्यात वखारी उघडण्यास सक्त मनाई केली होती. कारण, त्यांना माहीत होते की, उद्या हीच राष्ट्रे हळू–हळू आपली बीजे येथे रुजवून गुलामगिरी नांदविणार ! मोंगल सत्ताधाऱ्यांनी भारताबाहेरील इंग्रज, पोर्तुगीज, डच वगैरे लोकांना अनुज्ञा

देवून आपल्या प्रदेशात मालाच्या वखारी घालू दिल्या. पण शिवरायांनी मात्र त्यांना अजिबात थारा दिला नाही. या पाश्चिमात्य राष्ट्रांशी वागण्याचे महाराजांचे धोरण त्या मुस्लीमसत्ताधाऱ्यांप्रमाणे शिथिल नव्हते; अतिशय सावधपणाचे होते. दिसायला जरी हे लोक साधे–सुधे व्यापारी असले तरी बाहेरच्या स्वतंत्र राष्ट्राचे ते प्रतिनिधी आहेत, त्यामुळे ते संधी सापडताच व्यापाराऐवजी येथील प्रदेश जिंकून आपल्या राजसत्तेचे केंद्र निर्माण करतील हे महाराजांनी ओळखले होते तेव्हां त्यांना स्वराज्यात थारा देवू नये, परिस्थितीने द्यावाच लागला तर आपल्याला त्यांच्या राजसत्ताकेंद्र-निर्मितीच्या धोरणांचे पूर्ण नियंत्रण करता येईल अशा सावधगिरीनेच द्यावा, असे महाराजांनी धोरण आखले होते.

या उलट शिवरायांनी भारतातील, परप्रांतीय अथवा यवनांकित राज्यातील व्यापाऱ्यांना स्वराज्यात येऊन राहण्याविषयी व व्यापार करण्याविषयी उत्तेजन दिले होते. परराष्ट्रातील बडे व्यापारी त्यांच्या राष्ट्रांवर आलेल्या संकटामुळे किंवा त्यांची व्यापारी गलबते समुद्रावर लुटल्यामुळे किंवा अन्य कांही कारणामुळे आपल्या प्रदेशांत आले तर त्यांना वागविण्यासंबंधी विशिष्ठ धोरण महाराजांनी आखले होते. तसेच स्वराज्याला स्थिरता मिळण्याच्या दृष्टीने शत्रूच्या सेवकासंबंधी वागावयाचे धोरण व व्यापाऱ्यांविषयी वागावयाचे धोरण निरनिराळ्या स्वरूपाचे ठेवले होते.

शिवरायांनी स्वराज्यातील रयतेला जिविताचे व अधिकारांचे संरक्षण मिळवून त्यांचे जीवन निश्चित केले. स्वराज्याभोवती दिल्लीचे मोंगल बादशहा, विजापूरचे आदिलशहा, गोवळकोंड्याचे कुतुबशहा, जंजिऱ्याचे हबशी, जव्हार व रामनगरचे राजे यांचे व पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच यांनी बळकावलले प्रदेश होतेच. आपल्या स्वराज्याला कसल्याही प्रकारचा आणि कोणाकडूनही धोका पोहोचर्णार नाही अशी वागणूक शिवराय या परराष्ट्रीय लोकांबरोबर ठेवीत. स्वराज्यातील लोकांना परराष्ट्रात चांगली वर्तणूक मिळेल असा वचक ते परराष्ट्रात निर्माण करीत. ही व्यवस्था परिस्थिती सापेक्ष महाराजांनी दोन प्रकारची ठेवली होती. परराष्ट्राशी

सलोख्याचे संबंध असतानाचे व्यावहारिक धोरण व नियम हे एका प्रकारचे, तर परराष्ट्रांशी शत्रुत्वाचे संबंध असतानाचे व्यावहारिक धोरण व नियम हे दुसऱ्या प्रकारचे असत.

शिवरायांनी आपल्या स्वराज्याचे सुराज्य बनवले त्याला कारण त्यांची यशस्वी राजनीतीच दिसून येते.

*

# महाराजांचा लोकसंग्रह

शेवटी माणसाचे वैभव कोणते ?

सत्ता ?

रूप ?

पैसा ?

किती काळाच हे वैभव ? किती वेळ टिकणार हे सुख ?

किती दिवस रमणार या समाधानात ?

तरी...

तरी कोण आटापिटा.

तरी शेवटी एकाकीपणाची पोकळी आ वासून गिळायला उभीच. मृत्यूशय्येवर कळते कोणी आपला नाही... काहीच गवसत नाही.

महाराजांना मात्र सांगाव लागल,

" जरा सगळे बाहेर जा... "

डोळ्यात आंसू, पोरकेपणाची भावना.

" महाराज सोडून चालले. "

हजारो माणसे जातिवंत निष्ठा, भावपूर्ण भक्ती, भेटीची आगळी ओढ, दर्शनाची चढाओढ...

मुंगीसारखी माणसे...

का ? काय कारण ? सत्ता, रूप की पैसा ?

ही तर चिलटासारखी...

दिसते तसे नसते.

चकाकते ते सर्वच सोने कुठे असते ? म्हणून माणूस वाटतो तसा नसतो. त्याच चंचल मन ओळखणं, स्वत:कडे तर नव्हेच

पण राष्ट्राच्या प्रेमबंधनात युगे न युगे गुंतवून ठेवणं... राजेच करू जाणे.

महाराजांचा लोकसंग्रह ! पैशाने विकत घेतलेला नव्हता की सत्तेच्या आसूडाने नमवला नव्हता.

हजारो तऱ्हेची माणसे. कुठे हा गुण, कुठे तो... राज्याचा प्रपंच समर्थपणे सांभाळतांना हे राजीयाने केले. प्रत्येकाशी वागताना निराळी तऱ्हा.

काहीच... फक्त काहीच... अशी माणसे निवडली आहेत **कु. शैला नाईक** ( १० वी ) हिने.

कारण हेच खरे माणसाचे वैभव. मृत्यूनंतरही तेवत रहाणारे.

... शिवाजी राजांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे जे अनेक पैलू होते, त्यापैकी योग्य माणसांची पारख करून त्यांची योग्य जागी नेमणूक करून त्यांच्याकडून महत्त्वाची कामे कशी करून घ्यावी हा एक होय. माणसांच्या जिवावरच त्यांनी हिंदवी स्वराज्याची डौलदार आणि भक्कम इमारत अविश्रांतपणे खपून उभी केली. त्यापैकी काही निवडक माणसांचा संग्रह त्यांनी कसा केला हे पाहिले म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा पैलू स्पष्ट होईल.

**कान्होजी जेधे**–पूर्वी मावळामधल्या देशमुखांवर विजापूरकरांचा अंमल होता. त्याच्याकडून कान्होजी जेध्यांना एक फर्मान आले. त्यामध्ये शिवाजी एक लुटारू असून त्याचे पारिपत्य करण्यासाठी येणाऱ्या अफझुलखानाला मदत करावी असा हुकूम झाला. कान्होजीने संकट ओळखले. खान स्वकीयांचे ( महाराजांचे ) पारिपत्य करण्यास येतो त्यास मदत ? डोक्यात वादळ उठले. घराण्याचा सत्यानाश टाळण्यासाठी खानाचे पाय धरावयाचे. कान्होजी आपल्या चार मुलांसह महाराजांकडे निघाले. महाराजांचा मुक्काम शिवापुरास होता. कान्होजी येताच महाराजांनी विचारले, ' आज काय येणे केले ? ' लगेच बादशाही फर्मान महाराजाना दाखवून उभे राहिले. लगेच महाराज म्हणाले, ' तुमचे जातभाई खंडोजी खोपडे, जगदाळे खानाकडे गेले

आहेत, स्वराज्यातील माणसे खानाकडे निघाली, तुमच्या जिवावर संकट येऊन पडले आहे, तुम्हीही जा.'

कान्होजीचे काळीज चरकले. 'महाराज, जेध्यांची औलाद हरामखोरांची नाही. सतरा जहागिऱ्या ओतल्या तरी तुमच्याशी हरामखोरी करणार नाही. मी आणि माझी मुले तुमच्या पायावर पडतो. निरवंश झाला तरी चालेल.' महाराजांनी कान्होजीला आणि कान्होजीने महाराजांना अगदी जवळून ओळखले. अशा प्रसंगाने महाराजांनी एक जिवलग स्वराज्याच्या सेवेत आणला.

**बाजी पासलकर**– हे मावळातील देशमूख. स्वभावाने अतिशय चांगले, पुण्याजवळ राहणारे, दिलदार, सज्जन, शूर होते. लोक त्यांना 'यशवंतराव' म्हणत. देहाने प्रचंड, शरीराने बळकट अशा या माणसाला महाराजांनी आपल्या मायेत घेतले आणि त्याचा महाराजांचेवर जीव जडला. दोघे जीवांभावाचे मित्र बनले, हा नेकजात मराठा महाराजांनी हेरून आपल्या संग्रही आणला, महाराजापेक्षा वडील परंतु त्यांचा शब्द प्रमाण मानून प्राण देण्याची तयारी करणारा.

**कावजी भिमाजी वाघ**– फत्तेखानाशी लढण्याचा प्रसंग– त्याबरोबर त्याचा वकील बाळाजी हैबतराव हा मराठा होता. खानाने शिरवळचा सुभाजमंगल किल्ला जिंकला. महाराजांनी प्रसंग ओळखला. बाळाजी हैबतरावाचा काटा काढण्याचा बेत रचला. लगेच महाराजांनी हुकूम केला. बाळाजीला पकडून, शिरवळ सोडवा. येथे महाराजांना आणखी एक हिरा सांपडला. भिमाजी वाघ अती चपळ, सुसरीसारखा, भीमाचे बळ असलेला, शिवाय महाराजांचे संगतीत वाढलेला कावजी सैन्यासह शिरवळकडे दौडत निघाला. ही बातमी बाळाजीला समजली. अचानक झालेल्या हल्ल्याने त्याची फौज गोंधळात पडली. बाळाजीची गाठ पडली कावजीशी. अटीतटीचा सामना रंगला. कावजीचा भाला बाळाजीच्या वर्मावर बसला. बाळाजी ठार झाला. किल्ला सर झाला. कावजीच्या हाती खूप संपत्ती लागली. स्वराज्याची पहिली लढाई कावजीच्या पराक्रमाने जिंकली गेली.

महाराजांनी कावजीची पाठ थोपटून 'शाबास! शाबास!' असे उद्‌गार काढून त्याच्या पाठीवरून हात फिरवला. सोन्याचे कडे बक्षीस दिले. अशा सारख्या गुणवान माणसांचा संग्रह महाराजांनी तयार केलेला होता.

**मुरारबाजी देशपांडे**- महाराजांनी जावळीच्या मोऱ्यावर छापा घातला. त्यावेळी खुद्द महाराज जावळीत होते. त्यावेळी त्यांची नजर अटीतटीने लढणाऱ्या मुरारबाजीकडे गेली. त्यावेळी तो मोंगलाच्या बाजूने लढत होता. पण आपण स्वकीयाविरूद्ध का लढतो, त्याला असे कोणी शिकवले, असा विचार सहजच महाराजांच्या मनात आला. त्यानी लगेच जावळी जिंकल्यावर मुरारबाजीला समजावले, 'मोऱ्यांना भोसल्यांनीच आधार दिला. मोरे चुकले. मुरार, तू आता चुकू नयेस!' त्यांनी जणू काय त्याला मागणीच घातली. 'स्वराज्याच्या चाकरीत ये आणि तू यावास अशी माझी इच्छा आहे. तुझ्या पराक्रमाची शर्थ उंचावेल' आणि एक हिरा महाराजांना सांपडला. याच हिऱ्याने महाराज पुरंदरच्या वेढ्यात सांपडले असता पराक्रमाची शर्थ केली. अनेक गुणांचा साठा असलेला अष्टपैलू हिरा. खानाने फितुरीसाठी जाळे टाकले. तो म्हणाला, 'शूर वीरा, तुझा पराक्रम पाहून मला आनंद झाला. तू आमच्या समवेत आलास तर आम्ही तुझा मान सन्मान करू.' हे ऐकताच मुरारबाजीला संताप आला. स्वामीनिष्ठेचा अपमान, मुरारबाजीला जहागिरी नको होती. हवे होते खानाचे मुंडके. पराक्रमी मुरारबाजी लढता लढता पुरंदरच्या मांडीवर पडला. अशी माणसे अशा प्रसंगातच महाराजांनी हेरली. एक एक माणूस एक एक चिरेबंद दगड तयार झाला. मरता मरता शिरावेगळे धड ३०० यवनांना आपल्याबरोबर घेऊन गेले. अशा माणसांचा संग्रह महाराजांनी केला.

अफझुलखानाच्या भेटीचा प्रसंग. प्रतापगडाच्या पायथ्याशी महत्त्वाच्या घटना घडत होत्या.

प्रचंड देहाचा खान आपल्या सहकाऱ्यासह, सय्यदबंडा आणि वकील कृष्णाजी भास्कर यासह शामीयान्याकडे येत होता.

महाराज आपल्या सहकाऱ्यासह प्रतापगडावरून खाली येत होते. नंतर खानाने महाराजांना आलिंगन देऊन ठार मारण्याचा प्रयत्न करताच

महाराजांनी प्रसंगावधानानी खानाची आतडी बाहेर काढली. खान ओरडला, इतक्यात खानाच्या वकिलाने महाराजांवर मोठ्या हिकमतीने वार केला. तो अडवून महाराज म्हणाले 'ब्राह्मणास शिवाजी मारणार नाही.' तरीही कृष्णाजीपंतानी पुन्हा वार केला. त्यावेळी महाराजांनी कोणताही विचार न करता कृष्णाजी पंताना ठार केले.

खानाचा शरीररक्षक सय्यदबंडा पुढे आला. तेवढ्यात महाराजांचा शरीररक्षक जिवा महालाने पुढे जाऊन सय्यद बडाला ठार केले. 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' प्रसंगावधानी माणूस, विश्वासू, पराक्रमी माणूस महाराजांनी याप्रसंगी हेरला.

**बाजीप्रभू देशपांडे**– पन्हाळगडावर महाराज सिद्दी जोहारच्या वेढ्यात पडले. महाराजांना सोडविण्यासाठी नेताजी पालकराने शर्थीचे प्रयत्न केले, पण खानाकडून थोडासा पराभव खावा लागलेला नेताजी आणि त्याचा सहकारी सिद्धी हिलाल रायगडावर परतले. महाराजानी खानाबरोबर तहाची बोलणी चालू केली. महाराजांचा वकील गगाधरपंत हा खानाबरोबर तहाची बोलणी करण्यास रवाना झाला. बाजीप्रभू देशपांडे महाराजासमावेत होते. त्यापूर्वी महाराजांच्या हेर खात्यानी उत्तम कामगिरी बजावली. वेढा ढिला पडला. महाराजांनी विशाळगडाकडे जाण्याचे ठरविले. किल्ल्यावरून निसटले. वेढ्याची हद्द संपली. महाराज निसटल्याची खबर खानाला मिळाली आणि पाठलागास सुरूवात झाली बाजीने महाराजांना सांगितले. 'तुम्ही इथे थांबू नका. गनिम अफाट आहे. विशाळगडाकडे जा, मी खिंड रोखून धरतो.'

अशी माणसे महाराजांनी महाराष्ट्राचा संसार करण्यासाठी जणू काय हेरली होती. शेवटी त्याने शर्थीन खिंड लढवली. पण बाजीप्रभू पडला. गाजीपूरची खिंड पावन झाली. बाजीप्रभू हे हिरडस मावळचे पिढिजात देशपांडे. असा हिरा महाराजांना लहानपणीच सापडला आणि त्यांच्या समवेतच मोठा झाला आणि असा इतिहास घडला.

**बहिर्जी नाईक**– बहिर्जी म्हणजे अनेक गुणांचा सांठा. जणू काय बहुरुपीच. तो उत्तम हेर होता, तो सोंगाड्या होता, उत्तम सेवक होता. पुष्कळ विशेषणे अपुरी पडतील, पण बहिर्जी अपुरा पडणारा नाही.

सुरतेची सर्व माहिती काढण्याचे काम या उत्तम हेराकडे सोपवले आणि सर्व माहिती महाराजांना समजली. महाराजांनी सुरतेवर स्वारीचा बेत आखला. सुरत अक्षरशः लुटली. अगणित सपत्ती मिळवली, ती बहिर्जी नाईकसारख्या बहुगुणी माणसाच्या जोरावरच. त्याचा सत्कार महाराजांनी मायेची पाखर घालून केला.

**नेताजी पालकर–** महाराजांचा बालसवंगडी याच नेताजीने महाराजांना वेळोवेळी साथ दिली. शाहिस्तेखानाच्यावेळी लाल महालावर छापा घालतांना त्याने अफाट पराक्रम केला होता. त्याच्या कामगिरीवर खूष होऊन महाराजांनी 'सरनौबत' हा किताब दिला. परंतु कामात हलगर्जीपणामुळे महाराजांनी किताब काढून घेतला. त्यावेळी नेताजीने स्वराज्य सोडून विजापूरकराकडे नोकरी धरली. त्याची जागा प्रतापराव गुजरांना मिळाली. त्यानंतर मिर्झाराजानी ही संधी साधून नेताजीची विनवणी केली व त्याला आपल्या बाजूला ओढले. त्याला ५००० ची मनसबदारी व ५० हजार रोख बक्षीस मिळाले. त्यावेळी नेताजी मोंगलाच्या छावणीत हजर झाला.

ज्यावेळी शिवाजी महाराजांनी आग्र्याहून सुटका करून घेतली, त्यावेळी शिवाजीचा संताप नेताजीवर काढण्यात आला. त्याला पकडून कडक बंदोबस्तात दिल्लीला पाठविण्यात आले. तुरुंगात ठेवले, अनन्वित छळ केला. सुटका होण्यासाठी दोन मार्ग होते. मरण किंवा धर्मान्तर. त्यावेळी महाराज त्याला आठवले. मराठा क्षत्रिय जिद्दीचा गडी पण वाकला आणि धर्मांतरास तयार झाला. धर्मांतर, वेषांतर व स्थलांतर. त्याचे नांव महंमद बुलिखान ठेवण्यात आले. आणि रवानगी काबूलकडे झाली. मोहिम संपल्यावर या प्रति शिवाजीलाच शिवाजीवर पाठविण्याची योजना तयार झाली. त्याप्रमाणे हुकूम निघाला. त्याबरोबर स्वराज्यात येण्याची संधी मिळाली. पण महाराज काय म्हणतील ? त्यांचा विश्वास बसेल का ? संधी मिळताच धाडस करून महाराजाकडे आला. त्याला पश्चात्ताप झाला होता. महाराजांनी पुन्हा त्यांचे धर्मांतर करून घेतले. महाराजांचा जिवलग महाराजांना भेटला. शिक्षा न देता स्वागत केले. औरंगजेबाला धक्का बसला.

मिर्झाराजांनी ज्यावेळी महाराजांबरोबर तह केला, त्या तहाप्रमाणे महाराज औरंगजेबाच्या भेटीस निघाले. बरोबर खासे निवडक लोक घेतले. निराजी रावजी, डबीर, हिरोजी फर्जंद, मदारी मेहत्तर, कविंद्र परमानंद इत्यादी जीवाला जीव देणारी मंडळी वाघाच्या जबड्यात जाताना बरोबर घेतली.

दरबारात अपमानित झालेल्या महाराजांना बादशहाने कैद केले. सुटण्याचे प्रयत्न सुरू झाले. काही मावळ्यांना परतीची परवानगी मिळाली, योजनेप्रमाणे महाराजांची प्रकृती बिघडली. दानधर्मासाठी मिठाई वाटण्यात आली. त्याचवेळी महाराजांनी पळून जाण्याची महत्त्वाकांक्षी योजना आखली. आपल्या हातातील सोन्याचे कडे हिरोजी फर्जंदच्या हातात घातले. महाराज व संभाजी पेटाऱ्यात बसले. हिरोजी महाराजांचा शेला पांघरून आपण जणू काय महाराजच आणि मेहतर त्याचे पाय चेपीत बसला.

कशाकरता झोपला होता हिरोजी ? फक्त मरण्याकरता. आणि मदारी त्यासाठीच. त्याचे धाडस आगळेच. अगदी लहान त्यानी प्रेम आणि निष्ठा महाराजांना वाहिलेली होती. हिरोजी उठला. गादीवर माणूस झोपल्याचा आकार देऊन त्यावर शेला पांघरून स्वतःचे मुंडासे अंगात घालून मदारी व तो औषध आणण्यासाठी बाहेर पडले ते पुन्हा परत आलेच नाहीत. महाराजासाठी जीव देण्यास तयार झालेले–त्यांना महाराजांनी अलोट प्रेमाने आपलेसे केले होते.

**तानाजी मालुसरे**– कोंडाणासारखा किल्ला मोंगलाच्या ताब्यात असणे म्हणजे स्वराज्याला धोका. गडातील गड कोंडाणा, तो आपल्या ताब्यात आणण्याचा निश्चय महाराजांनी केला, पण अतिशय अवघड कोंडाणा ताब्यात कोण आणणार? महाराजानी शब्द फेकला आणि तो झेलला गेला. उठला एक जवान. महाराजांचा खेळगडी तानाजी मालुसरे. कितीही रक्कम मोजली तरी अशी माणसे मिळायची नाहीत. तानाजीचे महाराजांनी कौतुक केले. त्याच्या मदतीला त्याचा भाऊ सूर्याजी. यांनी महत् प्रयासाने कोंढाणा सर केला. पण तानाजी पडला महाराजांचा उजवा हात तुटला. अनेक वर्षे महाराजांची आईसारखी सेवा करणारा तानाजी पडला !

महाराजांना अतिशय दु:ख झाले. महाराज म्हणाले, ' एक गड घेतला, परंतु दुसरा एक गड गेला ! ' तानाजी अजरामर झाला. कोंडाण्याबरोबरच तानाजी अमर झाला. असा माणसांचा संग्रह महाराजांनी तयार केला होता.

राज्याभिषेकाचे वेळी महाराजांनी पुष्कळ दानधर्म केला, देणग्या दिल्या, सर्वांना सर्व काही दिले. सर्व सुखी झाले. परंतु एका तरूणाची महाराजांना आठवण झाली. कोण हा तरूण ? मदारी मेहत्तर. आग्र्याच्या बंदिवासात हिरोजीबरोबर स्वत:चे प्राण आपल्या धन्यासाठी तळहातावर घेणारा एक मुसलमान. त्याला काय द्यावयाचे ? महाराजांनी त्यालाच विचारले, तुला काय देऊ ? ' मदारीने काहीच मागितले नाही. तो म्हणाला, ' महाराज, आपल्या सिंहासनावर चादर पांघरण्याचे काम मला द्या ! ' असा निस्पृहपणा जगाच्या इतिहासात हुडकून सापडणार नाही. त्यांची पारख महाराजांनी अचूक केली होती. आणि त्यांची सेवा स्वराज्याचे कामी लावली. हीच महाराजांची लोकोत्तर, लोकसंग्राहक वृत्ती.

महाराजांनी या आपल्या सगळ्या सवंगड्यांना काय दिले ? पुष्कळ दिले. ते सोन्या-चांदीत, पैशात दिले असते, तर संपून गेले असते. पण महाराजांनी स्वत:लाच देऊन टाकले होते. या गुणानेच महाराजांना अलौकिकत्व मिळाले.

*

# महाराज, खरे युगपुरुष

इतक्या लेखातून इतके गुण पाहिले, पण तेवढेच म्हणजे शिवाजीराजे नव्हे. ते तर एक तुफान. एखादा कण म्हणजे वादळ नव्हे, एक अवयव म्हणजे हत्ती नव्हे, एक शक्ती म्हणजे परमेश्वर नव्हे.

राजे ह्या गुणांनी तर युक्त होतेच, पण तेवढेच नव्हते- ह्याही पलिकडे आणखी काही होते... काय होते ते शब्दात मांडता येणार नाही- शब्द शबल ठरतात. मग काय 'युगपुरुष !' खर म्हणजे या शब्दाने महाराजांचा सन्मान होण्याऐवजी महाराजांमुळे या शब्दाला अर्थ प्राप्त झाला, तेज मिळाले, चैतन्य मिळाले. आता आणखी कुणाला युगपुरुष हा शब्द शोभत नाही. नव्हे नव्हे.

'युगपुरुष' हा शब्द तसा महाराजांचे वर्णन करायला थिटाच पडतो.

कोणत्याही शद्वात न सांपडणारे त्यांचे कर्तृत्व, कोणत्याही मापट्याने न मापता येणारे त्याचे गुण. मग हा ११ वी मधील **मारुती पाटील** तरी कसे वर्णन करणार !

... शिवाजीचा खरा मोठेपणा हा की त्यावेळी देशातील सर्वसामान्य जनतेमधला स्वाभिमान लुप्त होऊ लागला होता. परकीय मोंगली सत्ता या देशावर आपले नियंत्रण प्रस्थापित करू पहात होती व या देशातील सर्व लोकांनी त्या सत्तेपुढे शरणागती पत्करून त्या सत्तेची सेवाचाकरी करण्यातच धन्यता मानली होती. अशावेळी शिवाजीने महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांत स्वदेशाभिमान जागृत केला व वैभवाच्या शिखरावर असलेल्या मोंगली सत्तेशी व इतर मुसलमानी राज्याशी लढा देऊन स्वतःचे नवीन राज्य

स्थापन केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही विजापूरकर आणि कुतुबशाही यांच्या विरुद्ध दंड थोपटले व आपणही राज्य स्थापन करू शकतो असे आपल्या देशबांधवांना दाखवून दिले.

शिवाजीच्या उदयापूर्वी मराठे सरदार दक्षिणेतील मुसलमानी राज्यांची चाकरी करून त्यांच्याकडून मानमरातब मिळविण्यात दंग झाले होते. अशा मराठ्यांना एकत्र आणून शिवाजीने त्यांच्याकडून स्वराज्य स्थापन करून घेतले आणि तेही सभोवताली बलिष्ठ शत्रूचा सतत धोका असताना. कोणत्याही मध्ययुगीन हिंदूने शिवाजीसारखे कर्तृत्व दाखविले नाही.

शिवाजीचे कार्य तर फार मोठे होतेच. पण तसेही त्यांनी काय केले हे पहाण्यापेक्षा त्यांनी काय करण्याचा प्रयत्न केला हे पहाणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या देशबांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकविले व धर्मासाठी लढण्यास शिकविले. स्वतः धार्मिक वृत्तीचे व धर्माभिमानी असूनसुद्धा इतर धर्माच्या लोकांचा किंवा साधूसंतांचा धार्मिक छळ केला नाही. शिवाजी महाराजांची सहिष्णुता त्यावेळी खरोखरच आश्चर्यकारक होती. एका बाजूला धर्मान्ध झालेले यावनी राज्यकर्ते हिंदूंचा अनेकप्रकारे छळ करीत होते. अशा परिस्थितीत हिंदूंना जीवन असह्य करून टाकीत होते. दुसऱ्या बाजूला या हिंदु राजाने सर्व धर्माच्या लोकांना संरक्षण द्यावे, हिंदु साधूसंताप्रमाणेच मुसलमानी फकिरांचाही आदर करावा. कोणत्याही धार्मिक इमारतींना व धार्मिक ग्रंथांना धक्का न लावण्याबद्दल सक्त ताकीद आपल्या सैन्याला दिली होती. महाराज हे नुसतेच शूर नव्हते, तर इतरांच्यातही आवेश निर्माण करण्याची वैशिष्ठ्यपूर्ण शक्ती त्यांच्यात होती. त्यामुळेच त्यांनी आपल्या सामान्य जनतेला शून्यातून साम्राज्याकडे नेले. शिवाजीने दिलेल्या या शिकवणुकीमुळे संभाजीच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत १८ वर्षे मराठ्यांनी राज्य टिकवून धरले आणि मोंगल साम्राज्य खिळखिळे करून सोडले. शिवाजी महाराजांचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञान. आपल्या भोवतालची परिस्थिती व आपली कुवत लक्षात घेऊनच आपल्या सर्व योजना यशस्वी केल्या. अशक्य कोटीतील व परिस्थितीशी विसंगत योजना अमलात आणण्याचा त्यांनी कधीच प्रयत्न केला नाही. ते धाडसी होते, पण त्यांचे धाडस सभोवतालच्या

परिस्थितीनुसार योजलेले असे. कुठे थांबावे हे ते अचूक जाणत होते. म्हणूनच म्हटले जाते की, त्या काळातील कदाचित इतर कोणत्याही व्यक्तीला शिवाजीइतकी आपल्या शक्तीची व आपल्या शत्रूच्या दोषस्थळाची यथार्थ जाणीव नसेल. त्यांनी आपल्या अनेक लढ्यात सैन्याचे नेतृत्व स्वीकारले होते. विशेषत: अत्यंत महत्वाच्या प्रसंगी ते स्वत: आघाडीवर जात असत. सुरतेची लूट, शाहिस्तेखानावरील स्वारी, कर्नाटकावरील स्वारी इत्यादि मोहिमांत त्यांनी नेतृत्व स्वीकारून आपल्या सैन्यापुढे शौर्याचे व धाडसाचे प्रात्यक्षिक ठेवले, पण शूरपणा व धाडस याबरोबर असामान्य धैर्य त्यांच्या अंगी होते. आणीबाणीच्या प्रसंगी या धैर्याच्या जोरावरच ते आपले राज्य टिकवू शकले. त्यांच्यावर जी संकटे आली ती खरोखर भयानक स्वरुपाची होती. त्यातूनही ते निभावून निघाले. अफझलखानाची स्वारी, पन्हाळगडावर असतांना सिद्दीजोहरने घातलेला वेढा, शाहिस्तेखानाचे आगमन, जयसिंग व दिलेरखानाची स्वारी, ही संकटे इतकी भयानक होती की कितीही शूर व धाडसी योद्धा असता तरी तो पिचूनच गेला असता, पण शिवाजीनी आपल्या असामान्य धैर्याच्या जोरावर या संकटावरही मात केली व अक्कलहुशारीने त्यातून मार्ग काढला.

शिवाजी महाराजांनी असामान्य यश मिळविले ते सर्वस्वी स्वत:च्या ताकदीवर. कुणाही परकीय शाहीची त्यांना मदत नव्हती. त्यांच्यापुढे कोणताही आदर्श नव्हता किंवा त्यांना कोणाचेही मार्गदर्शन नव्हते. इतरांचे अनुकरण न करता आपल्या सैनिकांना आपल्या देशाला व आपल्या शक्तीला योग्य ठरण्याच्या मार्गाचा त्यांनी अवलंब केला. त्यांनी शत्रूला सतत धूळ चारून आपल्या हयातीत आपल्या राज्याचा विस्तार नेहमीच वाढता ठेवला. या सर्व गोष्टींचा विचार केला असता, महाराजांनीच परकीय सत्तेखाली भरडून जाणाऱ्या जनतेला अंधाराकडून प्रकाशाकडे आणले व त्यांनी स्वत:च्या पायावर व स्वराज्यात कसे वावरावे याचा धडा शिकविला आणि परकीयांना आपल्या देशातून हाकलून दिले. या जगात ज्या ज्या थोर पुरुषांनी महान कार्ये केली, त्या त्या पुरुषांमध्ये शिवाजीमहाराजांचे नाव अजरामर आहे. त्यांच्या या महान कार्यामुळे त्यांना युगपुरुष म्हणतात.

*

# आदर्श गुरू शिष्य

अस असत माणसाच चंचल मन, इतक की आपले खरे स्वरूप, आपला खरा स्वभाव याच आकलन त्याच त्याला होत नाही. असंख्य तऱ्हेचे प्रश्न, सृष्टीविषयक, दैवी शक्तीसंबंधी,... कितीतरी आणखी... अर्थात फक्त विचार करणाऱ्याला– जागृत मन असणाऱ्यालाच.

जसा रोग आपला आपल्याला ओळखता येत नाही की त्यावर इलाजही करता येत नाही... तेथे डॉक्टर हवाच. योग्य–जाणता... नीट उपचार करणारा, रोगमुक्त करणारा...

गुरू म्हणजे एक प्रकारचा डॉक्टरच. मनावर चढलेली असंख्य पुट असतात. चित्ताच्या गाभाऱ्यात नको ती जळमट असतात.

कर्तव्य समजत नाही.

मायेची जाळी गुरफटून टाकत असतात.

गुरूची आवश्यकता वर्णन करायला शब्द थिटे पडतात.

तो आधार, त्या आधारावर आपण बंधमुक्त व्हावे– कर्तव्य-निष्ठ व्हावे...... बैठक असावी भक्तीची, वृत्ती व्हावी उदासीनतेची... मूक व्हावी वाणी...

राजांनी हे जाणले, मानले, आचरणात आणले आणि ज्याअर्थी या स्वतंत्र विचाराच्या, सहसा न चुकणाऱ्या राजाने मानले त्याअर्थी नक्कीच काही अर्थ आहे. इतके मानले की गुरूच्या झोळीत राज्य टाकले.

गुरू असा समर्थ ते त्याने परत दिले आणि सांगितले हे 'श्री' चे राज्य समजून राज्यकारभार करा.

रामदास आणि शिवाजी.

ज्ञान आणि पराक्रम.

नि:संग आणि सत्ताधीश.

सत्ताधीशाने ज्ञानी, नि:संग व्यक्तीचा कसा उपयोग केला, कोणते महत्त्व दिले, काय शिकून घेतले आणि त्या नि:संगाने शिष्याचे गुण ओळखून त्याचा उपयोग या राष्ट्राकरता कसा केला...

असा गुरू असा शिष्य पुन्हा होणे नाही.

आम्ही नुसतेच आक्षेप घ्यावेत, फाटे फोडावेत, आपल्या टिचभर मापट्याने हिमालयाच्या उंचीची माणसे मापावीत... पैलतीरावरचे अर्थ ऐलतीरावरून लावत बसावे...

वादावादी, उत्तरे, प्रतिउत्तरे...

**नानासाहेब भोसले** ( ११ वी ) याने काही याबाबत पकडायचा प्रयत्न केला आहे...

... **श्री** शिवछत्रपति व श्री समर्थ यांच्या राजकीय व आध्यात्मिक संबंधाविषयी पूर्वी कांही वाद नव्हता, पण अलिकडे त्यावर मोठेच वादंग निर्माण झालेले आहेत. काही लोकांना समर्थ हे शिवरायांचे आध्यात्मिक राजकीय गुरू नि मार्गदर्शक होते असे वाटतेच; पण अफझुलखानाच्या वधासारख्या प्रत्येक महत्वाच्या कृत्यांत समर्थांचा हात असून शिवछत्रपती हे त्यांच्या हातांतील केवळ एक यंत्र होते, श्री समर्थ हे केवळ विरक्त साधू असून त्यांचा राजकारणाशी काहीच संबंध नव्हता असे काहींच्या मते होते. धर्मश्रद्धाळू पुरुषाप्रमाणे शिवछत्रपतीनी या विरक्त पुरुषाला आपला गुरू मानले आहे. त्यामुळे समर्थ केवळ त्यांचे आध्यात्मिक गुरू होते.

श्री समर्थ व भोसले राजघराणे यांचा संबंध राजे शहाजी यांच्यापासून होता. श्री रामदास हे नऊ वर्षाचे होते, तेव्हा त्यांनी दहा कोटी मंत्रजप केला. त्याचसमयी श्री शिवाजीचा जन्म ‘ शिवनेरी ’ येथे झाला. तीर्थयात्रेच्या निमित्ताने साऱ्या भारताचा प्रवास त्यांनी केला. हा प्रवास करीत असतांना यावनी अत्याचारांचे जे दारुण स्वरूप समर्थांच्या दृष्टीस

पडले, त्यामुळे त्यांचे अंतःकरण फाटून गेले. ते शेवटी मसूर, चाफळ व कऱ्हाड या प्रांतात राहण्याचा निश्चय करतात. यावर श्री. ज. स. करंदीकर प्रश्न करतात की, 'का येथे राहतात ?' त्याचे स्वाभाविक उत्तर हे आहे की, शिवाजीला साहाय्य होऊन, त्याजवर अनुग्रह करून जगदोद्धार करण्याच्या कार्याचा पाया घालण्याला हे स्थान सर्व प्रकारे सोईचे होते.

शिवाजी महाराजही मसूरास वरचेवर येत असत. अशा नाक्याच्या ठिकाणी समर्थांनी आपल्या पुढील कार्याची मुहूर्तमेढ रोवली व उत्सवही सुरू केला. याचवेळी केशव गोसावी म्हणतात की, समर्थ व शिवाजी महाराजांची पहिली भेट शके १५९४ मध्ये वैशाख महिन्यात झाली. ह्या भेटीला कै. चांदोरकर असे म्हणतात की, समर्थ रामदास हे शिवाजीचे मोक्षगुरू आहेत. शिवाजी महाराजांनी भेट दिली त्यावेळी रामदास पंचकातील, म्हणजे समकालीन असे जे प्रसिद्ध साधू होते ते सरदारासारखे ऐटबाज पोषाख करून रंगेलपणाने रहात. त्यामुळे त्यांच्या साधुत्वाबद्दल शिवाजी महाराजांना संशय आला. म्हणून स्वामींनी रेडा मारून व पुन्हां त्यास जिवंत करून महाराजांचा संशय दूर केला.

या नंतरच्या महाराजांच्या आग्र्याच्या संकटाच्या वेळी तर त्यांना समर्थांचे महत्त्वपूर्ण साहच झालेले आहे. आग्र्याला जाण्यापूर्वी महाराज श्री समर्थांच्या दर्शनाला गेले होते. श्री रामदास स्वामींचे दर्शन घेऊन सर्व वृत्त निवेदन करून समर्थ म्हणाले, 'तुमचा मुख्य धर्म राज्यसाधना करून धर्मस्थापना, देव–ब्राम्हणाची सेवा, प्रजेची पीडा दूर करून तिचे पालन रक्षण करावे. हे व्रत संपादून त्यात परमार्थ करावा. तुम्ही जे मनी धराल, ते श्री सिद्धीस पाववील !'

शिवछत्रपतींच्या व समर्थांच्या घनिष्ठ व जिव्हाळ्यांच्या संबंधांचा आणखी एक दाखला हा की, महाराजांच्या निधनानंतर अपार शोक होऊन त्यांनी अन्न वर्ज्य केले. धातूच्या भांड्याचा परित्याग करून ते खापराच्या भांड्यातून पाणी पीत असत. इतिहासाचा असा आणखी पुरावा की

शिवाजी महाराजांनी समर्थ रामदासांना गुरुदक्षिणा म्हणून आपले राज्य दिले ती भेट त्यांनी शिवाजीला परत केली.

'हे महाराष्ट्र राज्य म्हणजे देवाब्राम्हणांचे आहे.' त्यावरून शिवसमर्थांच्या शिष्यगुरूत्वाच्या संबंधावर उत्कृष्ट प्रकाश पडतो. श्री रामदासस्वामी हे श्री शिवछत्रपतींचे केवळ आध्यात्मिकच नव्हे तर प्रपंचविज्ञान व राजकारण यांचेही गुरू होते.

*

# कृतीचेच दर्शन

...वटी मग काय बिचारा सर्वसामान्य माणूस ! टीचभर ...ल्पनेने क्षितिज कवटाळू शकत नाही की टीचभर चोचीने ...सागर पिऊ शकत नाही !

...इलाज ?

शिवाजी झाला शिवाचा अवतार. शिवाई देवीचा महाप्रसाद !

-- - मग वाटू लागते, कृष्णाने वचन दिले होते ना.

धर्माची ग्लानी होईल तेव्हा भारताचा अभ्युदय करण्याकरता मी येईन...

छोटी, बालकासारखी मन मग तसा विचार करू लागते. आणि मानलेच अवतार तर वाटू लागते या भारताचा उद्धार करायला या शिवाने आपल्या बोलण्यातून, वागण्यातून, विचारातून... सगळ्यातूनच भारतीय संस्कृतीतील आदर्श, सुवर्णसमान संस्कारांचे दर्शन योग्य दिशेने, योग्य वेळेला, योग्य ठिकाणी केले.

तो भवानीचा आशीर्वाद घ्यायचा, मातेला सल्ला विचारायचा, गुरुची आज्ञा पाळायचा, मुलावर लक्ष ठेवायचा... परस्त्रीकडे सन्मानाने पहायचा, गुणाचे चीज खुल्या दिलाने करायचा, गुन्ह्याला शिक्षा करताना डरायचा नाही, राक्षसासारख्या दुष्ट शक्तीचा संहार ... दुर्बलाना आधार ... किती...

किती... आणि किती ?

सांगू दे आता ११ वी मधील **प्रतिभा मराठेच.**

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानम धर्मस्य तदात्मानं सृज्याम्यहम् ।।

जेव्हा जेव्हा भारताला ग्लानि येते, तेव्हा तेव्हा ईश्वरी अ होतो. कंससंहारासाठी वसुदेवदेवकी कंसाच्या बंदीशाळेत अ या भूलोकी अवतरला. अन्

यवनरुपी दानवसंहारासाठी आणि स्वतंत्र हिंदवी राज्याच्या साठीच की काय शिवनेरीच्या कुशीत सूर्यास्तसमयी फाल्गुन वद्य शुक्रवार शके १५५१ शुक्ल संवत्सर १९ फेब्रुवारी १६३० रोजी शि कृपेने, भारतमातेच्या भाग्याने जिजाईच्या पुण्याईने, शिवाजीच्या कोहिनूर उदयाला आला.

अन् हळूहळू हा बालशिवाजी चंद्राच्या कलाप्रमाणे वाढत होता अ तसतसे त्याचे मनोवेधक गुणही वृद्धिगत होत होते.

अनेक वर्षे यावनी साम्राज्यात पिचत असलेल्या मातृभूमीला मुक् करण्याच्या ध्येयाचे बीज जिजाईने बालशिवाजीच्या मनी ठसविले गोब्राह्मणप्रतिपालन, सर्व धर्माविषयी समान वागणूक, साधूसंतांची सेवा इ. नैतिक गुणांचा तसेच प्रत्येक क्षणाचा सदुपयोग, शत्रूमित्रपरीक्षा इ. व्यावहारिक गुणांचा उपदेश त्या माऊलीने पदोपदी केला. जिजाईसारखी राजकारणी धीरोदात्त माता, दादोजी कोंडदेवाचे शिक्षाप्रदान, शहाजीराजासारख्या पित्याचा ५–६ वर्षे सहवास, अन् कवी, शास्त्रज्ञ, कलावंत यांची ओळख, अशा तऱ्हेच्या अनुभवामुळे शिवबा पुढील आयुष्यात चुकता चुकता नाही तर न चुकताच शिकला.

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.' खरोखरीच शिवरायाच्या बाबतीत ही उक्ती यथार्थ अशी आहे. एकदा बालशिवाजी आपल्या सर्व मावळे सवंगड्यासह रोहिडेश्वर, जेजुरीचा डोंगराळ प्रदेश पहाण्यासाठी गेले असता एका गांवी गोमातेला उन्मत्त वाघाने ठार केले, तेव्हा या धीरोदात्त शिवरायाने प्रथम घनदाट जाळीत असलेल्या वाघास बंदूक मारली, पण नंतर घायाळ झालेल्या, संतापाने पेटलेल्या, अर्धवट मेलेल्या वाघास सामोरे



BVBK-0400885